सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २९६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ३० डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## नाशकात एबी फॉर्मवरून मोठा राडा भाजप शहराध्यक्षांच्या गाडीचा पाठलाग

### संतापलेल्या कार्यकर्त्यांनी फार्महाऊसचे गेट फोडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नाशिक**

नाशिक महानगरपालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत संपायला अवघे काही तास शिल्लक असताना, भारतीय जनता पक्षामध्ये अभूतपूर्व गोंधळ पाहायला मिळत आहे. भाजप यंदा नाशिकमध्ये स्वबळावर सर्व १२२ जागा लढवत आहे, मात्र ऐनवेळी 'एबी' फॉर्म न मिळाल्यामुळे इच्छुक उमेदवार आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांचा संयम सुटला आहे. आपला हक्काचा फॉर्म मिळवण्यासाठी कार्यकर्त्यांनी भाजप शहराध्यक्ष सुनील केदार यांच्या गाडीचा नाशिक-मुंबई महामार्गावर फिल्मी स्टाईलने पाठलाग केला.



महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. फॉर्म भरण्यासाठी काही तासच शिल्लक असून, अद्याप इच्छुक उमेदवारांना पक्षाकडून एबी फॉर्म मिळाले नाहीत. नाशिकमध्ये भाजप स्वबळावर लढणार असून, सर्व १२२ जागांवर आपले उमेदवार उभे केलेले आहेत. मात्र, निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्यांमध्ये नाराजी बघायला मिळत आहे. निष्ठावंतांचे तिकिट कापल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे. नाशिकमध्ये मोठा हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला.

मिळालेल्या माहितीनुसार, भाजपच्या अनेक निष्ठावंत कार्यकर्त्यांची तिकिटे कापली गेल्याची चर्चा रात्रीपासून सुरू होती. ज्यांना अद्याप फॉर्म मिळालेले नाहीत, असे अनेक इच्छुक उमेदवार शहराध्यक्ष सुनील केदार यांची भेट घेण्यासाठी जमले होते. मात्र, कार्यकर्त्यांच्या रोषाला सामोरे जाण्याऐवजी केदार यांनी गाडीतून निघून जाणे पसंत केले. यानंतर संतापलेल्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या गाडीचा पाठलाग सुरू केला. हा थरार नाशिक-मुंबई महामार्गावर बराच वेळ सुरू होता.शहराध्यक्ष आणि काही पदाधिकारी एका खाजगी फार्महाऊसवर थांबल्याची माहिती मिळताच कार्यकर्त्यांनी तिथे धडक दिली. फार्महाऊसचे मुख्य गेट बंद असल्याचे पाहून संतप्त कार्यकर्त्यांनी ते चक्क तोडून आत प्रवेश केला.

**गिरीश महाजन 'नॉट रिचेबल'**

नाशिकच्या राजकारणाचे चाणक्य मानले जाणारे संकटमोचक गिरीश महाजन हे देखील सध्या 'नॉट रिचेबल' असल्याची माहिती समोर येत आहे. यामुळे कार्यकर्त्यांमधील अस्वस्थता अधिकच वाढली आहे. नाशिकमधील हा महामार्गावरील थरार आणि गाडीचा पाठलाग यामुळे भाजपची अंतर्गत एकजूट धोक्यात आल्याचे चित्र निर्माण झाले. उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या टप्प्यात पक्षाला स्वतःच्याच कार्यकर्त्यांचा सामना करावा लागत आहे. यामुळे निवडणुकीच्या तयारीवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## नेत्यांसमोर मुजरा केल्याशिवाय कार्यकर्त्यांचे भले नाही

### जगदीश गुप्तांचा शिवसेना शिंदे गटाला 'रामराम'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

सर्व राजकीय पक्ष सारखेच आहेत. या पक्षांमध्ये नेत्यांच्या समोर मुजरा केल्याशिवाय कोणत्याही कार्यकर्त्याचे भले होत नाही, येथेही हीच परिस्थिती बघितल्याने निराश झालो. माझ्यासोबत अनेक 'कमिटमेंट' करण्यात आल्या, त्या काही वैयक्तिक नव्हत्या. ज्या लोकांनी मला अनेक वर्षांपासून साथ दिली, त्यांच्यासाठी मी या 'कमिटमेंट' स्वीकारल्या होत्या. पण, बोलणी झाल्यानंतर लगेच गोष्टी बदलत होत्या. पक्षात प्रवेश घेतल्यापासून ते आतापर्यंत वारंवार हे होत असल्याने आपण शिवसेना पक्ष ( शिंदे गट) सोडण्याचा निर्णय घेतला असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आपण पक्षसदस्यत्वाचा राजीनामा पाठवला आहे, असे माजी राज्यमंत्री जगदीश गुप्ता यांनी



मंगळवारी सकाळी पत्रकार परिषदेत जाहीर केले.

जगदीश गुप्ता म्हणाले, कोणत्याही राजकीय पक्षावर माझा विश्वास राहिलेला नाही. १९९० च्या काळात राजकारणामध्ये जी 'व्हीआयपी' संस्कृती निर्माण झाली होती, ती मोडून काढण्यासाठी मी तेव्हा राजकारणात आलो होतो. आताही फोफावत असलेल्या या व्हीआयपी संस्कृतीला तोडण्यासाठी मी शिंदे गटात प्रवेश घेतला होता. १९९० ते २००० पर्यंत राजकीय नेत्यापर्यंत पोहचण्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची गरज पडत नव्हती. पण, नंतर ती परंपरा तुटली. त्यामुळे मी विधानसभा निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला. तेव्ही गडबड झाली. मी पराभूत झालो. त्यानंतर, कार्यकर्त्यांसाठी मी सक्रीय राजकारण करण्याचा निर्णय घेतला. पण, मी 'आऊट डेटेड' राजकारणी झालो आहे. आजच्या राजकारणात माझ्यासारख्या कार्यकर्त्याला स्थान नाही. त्यामुळे आता कोणत्याही पक्षात जायचे नाही, हा निर्णय मी घेतला आहे. त्या निर्णयावर मी ठाम आहे.

जगदीश गुप्ता म्हणाले, ज्या कार्यकर्त्यांना त्यांच्यासोबत न्याय झाला नाही, असे वाटत असेल आणि निवडणूक लढण्याची तयारी असेल, अशा 'जिगरबाज' कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी मी सदैव तत्पर राहणार आहे. मी यापुर्वी जनकल्याण ही संघटना स्थापन केली होती, तेव्हा आम्ही उमेदवार शोधले होते. पण, आता आम्ही उमेदवार शोधणार नाही, तर सक्षम अशा कार्यकर्त्याला निवडून आणण्यासाठी मी खारीचा वाटा उचलणार आहे. मी पक्ष सोडताना कोणत्याही व्यक्तीवर टीका करणार नाही. माझा तो स्वभाव नाही. माझ्यासोबत ज्या 'कमिटमेंट' करण्यात आल्या, त्या पूर्ण झाल्या नाहीत, म्हणूनच मी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला आहे. अपक्ष म्हणून लढण्याची तयारी असलेल्या हिंमतबाज कार्यकर्त्याला बळ देण्याचे काम मी करणार आहे. कारण मला व्हीआयपी संस्कृती मोडून काढायची असल्याचे गुप्ता म्हणाले.

## रामदास आठवलेंचा मुंबईत 'राजकीय बॉम्ब'

### महायुतीने डावलल्याने ३९ उमेदवार रिंगणात उतरवले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी जागावाटपाचा तिढा सुटत असतानाच, महायुतीमधील महत्त्वाचा घटक पक्ष असलेल्या 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया'आठवले गटाने बंडाचे निशाण फडकवले आहे. भाजप आणि शिवसेनेने (शिंदे गट) आमच्याशी विश्वासघात केला आहे, असा घणाघाती आरोप करत रामदास आठवले यांनी मुंबईत स्वतंत्रपणे लढण्याची घोषणा केली. रिपाईने आज ३९ उमेदवारांची पहिली यादी प्रसिद्ध केली असून, मुंबईत दलित मतांच्या विभाजनामुळे भाजप-शिंदे सेनेची डोकेदुखी वाढणार आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, महायुतीच्या नेत्यांनी रिपाईला ७ जागा देण्याचे आश्वासन दिले होते. यासंदर्भात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री स्तरावर चर्चाही झाली होती. मात्र, भाजपने १३७ आणि शिवसेनेने ९०जागांची घोषणा केली, पण या यादीत रिपाईच्या एकाही उमेदवाराचे नाव समाविष्ट करण्यात आले नाही. अर्ज भरण्यासाठी अवघे काही तास शिल्लक असतानाही महायुतीकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने रामदास आठवले यांनी आक्रमक पवित्रा घेत, आपल्या पक्षाच्या ३९ उमेदवारांची यादी जाहीर केली.

**आता मागे हटणार नाही**

प्रसारमाध्यमांशी बोलताना आठवले म्हणाले की, आम्ही शेवटपर्यंत संयम राखला. ७ जागांची आमची माफक मागणी होती, पण आम्हाला झुलवत ठेवण्यात आले. आमच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड संताप आहे. त्यामुळेच आम्ही मुंबईच्या अस्मितेसाठी आणि आमच्या हक्कासाठी ३९ जागांवर लढण्याचा निर्णय घेतला आहे.

## सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री होणार? : प्रकाश आंबेडकरांच्या विधानाने चर्चांना उधाण

### अदानी यांच्या मध्यस्थीने शरद पवार एनडीएमध्ये म्हणत वडेट्टीवारांचाही दुजोरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई**

राज्यात सुरू असलेल्या महापालिका निवडणुकांच्या गदारोळात राजकीय समीकरणे झपाट्याने बदलताना दिसत आहेत. अनेक ठिकाणी महायुती तुटत असतानाच पुण्यात काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची युती फिस्कटल्याने वातावरण अधिकच तापले आहे. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसाच्या अगदी तोंडावर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केलेल्या विधानामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. सुप्रिया सुळे लवकरच केंद्रात मंत्री होतील, असे थेट भाकीत करत त्यांनी शरद पवारांकडून धक्कातंत्र



वापरले जाईल, असे संकेत दिले. त्यामुळे महापालिका निवडणुकांपुरती मर्यादित असलेली चर्चा थेट राष्ट्रीय राजकारणापर्यंत पोहोचली आहे.

महापालिका निवडणुकांमध्ये यंदा अभूतपूर्व गोंधळ पाहायला मिळत असून, राज्यातील १२ हून अधिक ठिकाणी महायुती कोलमडली आहे. भाजप आणि शिवसेना अनेक महानगरपालिकांमध्ये थेट एकमेकांविरोधात उभ्या ठाकणार आहेत. दुसरीकडे, पुण्यात काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची युती तुटल्याची अधिकृत घोषणा झाली आहे. जागावाटपावरून निर्माण झालेल्या मतभेदांमुळे ही युती फिस्कटल्याचे स्पष्ट झाले आहे. पुण्यातील पाटीलकीमुळे आमचे आणि काँग्रेसचे पटले नाही, असे स्पष्ट करत प्रकाश आंबेडकर यांनी वंचित बहुजन आघाडीला स्वबळावर निवडणूक लढवण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे पुण्याच्या राजकारणात नवे समीकरण तयार होण्याची चिन्हे दिसत आहेत.

या सर्व घडामोडींमुळे राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या उलथापालथीची शक्यता व्यक्त केली जात आहे. पुण्यात काँग्रेस आणि वंचित युती तुटली असली, तरी ही केवळ स्थानिक आणि तात्पुरती घडामोड आहे की आगामी मोठ्या राजकीय बदलांची नांदी आहे, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महापालिका निवडणुकांच्या धुरळ्यात सुरू असलेल्या या आरोप-प्रत्यारोपांमुळे मतदारांमध्येही संभ्रमाचे वातावरण आहे. सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री होतील का, शरद पवार एनडीएमध्ये जाणार का, की हे सर्व केवळ राजकीय दबाव तंत्र आहे, याची उत्तरे येत्या काळातच मिळणार आहेत.

## कोणत्याही महापालिकेत युती तुटलेली नाही पुढच्या दोन दिवसात..युती होईल - उदय सामंत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०पुणे**

भाजपाने शिवसेनेला सोबत घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी अनेक महापालिकांमध्ये गोंधळ उडाला. पुण्यात शिंदेसेनेचे उमेदवार आणि नेत्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला. छत्रपती संभाजीनगरमध्ये तर मंत्री संजय शिरसाट यांनी पत्रकार परिषद घेऊन भाजपाच्या अहंकारामुळे युती तुटली असे जाहीर केले. मात्र, त्यानंतर मंत्री उदय सामंत यांनी अजूनही महायुती तुटली नसल्याचे सांगितले.

पुण्यात माध्यमांशी बोलताना उदय सामंत म्हणाले, २९ महापालिकांच्या निवडणुका महाराष्ट्रामध्ये होत आहेत. यात सगळ्याच निवडणुका महत्त्वाच्या आहेत, पण जगाचे लक्ष लागलेलं आहे, ते मुंबई महापालिकेकडे. मुंबई महापालिकेत महायुतीचा भगवा फडकावण्यासाठी आम्ही सगळे एकदिलाने काम करत आहोत. पुढे जात आहोत.कोल्हापूर असेल, इंचलकरंजी असेल, कल्याण-डोंबिवली असेल, अमरावती,पनवेल असेल आणि महाराष्ट्रातील काही महापालिका असतील, या ठिकाणी देखील आम्ही महायुतीत लढत आहोत. कोणत्याही महापालिकेमध्ये महायुती तुटली, अशा पद्धतीचे चित्र नाही. हे मी पक्षाच्या वतीने स्पष्ट करत आहे, असे उदय सामंत पुण्यात बोलताना म्हणाले.

काही ठिकाणी कमी कालावधीमुळे असेल किंवा एकमत न झाल्यामुळे एबी फॉर्म दिले गेले आहेत. पण, म्हणून मी उल्लेख केला की, ठाण्यात दिले गेले नाहीत. कल्याण-डोंबिवलीमध्ये दिले गेले नाहीत. कोल्हापूर, इंचलकरंजी, पनवेल नाही. छत्रपती संभाजीनगरला एकमत न झाल्यामुळे पुण्यासारखं चित्र आहे, ते देखील आम्ही दोन दिवसात दूर करू, अशी माहिती उदय सामंत यांनी दिली.

## अजित पवारांकडून गुंड आंदेकरांच्या घरात दोघींना उमेदवारी

### गजा मारणेच्या पत्नीनंतर आंदेकर टोळीला पाठबळ? राष्ट्रवादीच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०पुणे**

पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत संपत असताना, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने गजा मारणेंच्या पत्नीनंतर आता स्वतःचा नातू आयुष कोमकर याच्या हत्या प्रकरणात आणि कोट्यवधींच्या खंडणी प्रकरणात सध्या येरवडा कारागृहात असलेल्या सोनाली वनराज आंदेकर आणि लक्ष्मी उदयकांत आंदेकर यांना प्रभाग क्रमांक २३ मधून अधिकृत उमेदवारी दिली आहे. आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर याच्या कुटुंबाला मिळालेल्या या राजकीय पाठबळामुळे पुण्याच्या राजकारणात नव्या वादाला तोंड फुटले आहे.



बंडू आंदेकर कुटुंबाच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे या उमेदवारीबाबत अजित पवार गटाने सुरुवातीपासूनच कमालीची गुप्तता पाळली होती. अधिकृत घोषणा न करता थेट अर्ज भरण्यावर भर देण्यात आला. जेणेकरून विरोधाची धार कमी करता येईल. मात्र, आज अर्ज भरण्याच्या शेवटच्या क्षणी आंदेकर यांच्या वकिलांनी भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयात धाव घेत 'एबी' फॉर्म सादर केले आणि ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. आंदेकरांच्या वतीने त्यांच्या वकिलांनीच ही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली.

बंडू आंदेकर आणि त्यांच्या कुटुंबातील महिला सदस्यांनी निवडणूक लढवण्यासाठी विशेष न्यायालयाकडे परवानगी मागितली होती. निवडणूक लढवणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने त्यांना अर्ज भरण्याची मुभा दिली. मात्र, न्यायालयाने काही कडक अटीही घातल्या आहेत.


अजित पवार यांच्या पक्षाकडून आज सकाळी कुख्यात गुंड गजा मारणेची पत्नी जयश्री मारणे हिला उमेदवारी देऊन चर्चेला उधाण आणले होते. आता त्यानंतर लगेचच बंडू आंदेकर कुटुंबाला उमेदवारी दिल्याने, अजित पवारांच्या 'गुन्हेगारीमुक्त पुणे' या घोषणेची खिल्ली उडवली जात आहे. ५ कोटी ४० लाखांच्या खंडणी प्रकरणात आणि हत्येसारख्या गंभीर गुन्ह्यात अडकलेल्या व्यक्तींना सत्ताधारी पक्ष उमेदवारी कशी देऊ शकतो, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

गुंड बंडू आंदेकर आणि गुंड गज्या मारणे या दोघांचाही गुन्हेगारीचा तगडा इतिहास आहे. या दोघांची गुन्हेगारी प्रकरणे राज्यभर गाजली आहेत. असे असताना, सत्ताधारी पक्षाने अशा प्रकारे गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीला पाठबळ दिल्याने पुण्यातील राजकीय वर्तुळात आता नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

## अमरावतीत युतीला तडा? भाजपसोबत युती असतानाही रवी राणांच्या युवा स्वाभिमान पक्षाची ४१ उमेदवारांची यादी जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षामधील युतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भाजप-युवा स्वाभिमान युती अस्तित्वात असताना युवा स्वाभिमान पक्षाने थेट ४१ उमेदवारांची यादी जाहीर केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.सूत्रांच्या माहितीनुसार, युतीच्या चर्चेत भाजपकडून युवा स्वाभिमान पक्षाला केवळ आठ जागा देण्यात आल्याचे सांगितले जात होते. मात्र, युतीतील




जागावाटपावर समाधान न झाल्याने आमदार रवी राणा यांनी स्वतंत्र भूमिका घेत थेट ४१ उमेदवारांची यादी जाहीर केल्याचे चित्र आहे. या निर्णयामुळे भाजप आणि युवा स्वाभिमान पक्षातील समन्वयाबाबत संशय निर्माण झाला असून, युती प्रत्यक्षात कितपत टिकणार याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.राजकीय जाणकारांच्या मते, युवा स्वाभिमान पक्षाच्या या निर्णयामुळे अमरावतीतील निवडणूक लढत अधिक चुरशीची होणार आहे. भाजपसोबतची युती केवळ कागदोपत्री राहणार की प्रत्यक्ष मैदानातही टिकणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, भाजपकडून अद्याप यावर अधिकृत प्रतिक्रिया आलेली नसली तरी आगामी काळात या निर्णयाचे पडसाद युतीच्या राजकारणावर स्पष्टपणे उमटण्याची शक्यता आहे.

## संपादकीय ......

# पर्यटकांसाठी पर्वणीचा काळ

नाताळ आणि नववर्ष हा गोव्यात पर्यटकांसाठी पर्वणीचा काळ असतो. सर्व प्रकारचे अनुभव येथे घेता येतात. नाताळचा आनंद, नववर्षअखेरीस होणारे संगीत कार्यक्रम तसेच गोव्यातील जत्रा, काले, धालोसारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानीही पर्यटकांना अनुभवता येते. गोवा हे देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात लोकप्रिय आणि आवडीने भेट दिले जाणारे पर्यटन स्थळ मानले जाते. अरबी समुद्राच्या सान्निध्यात वसलेले हे छोटेसे राज्य जगभरातील पर्यटकांना आकर्षित करत आले आहे. इथली निसर्गसंपदा, किनारे, खाद्यसंस्कृती, पोर्तुगीज वारसा, सण-उत्सव, संगीत, नृत्य, उदार मनाची माणसे आणि इथला निवांतपणा या राज्याला वेगळे स्थान मिळवून देते. विशेषत:, नाताळ आणि वर्षाचा शेवटचा काळ हा गोव्यातील पर्यटनाचा सुवर्णकाळ मानला जातो. जगाच्या कानाकोपर्यातून लोक या काळात गोव्याच्या दिशेने ओढले जातात. मुंबई, पुणे, दिल्ली, कोलकाता यांसारख्या महानगरांतील प्रवासीच नव्हे तर ब्रिटन, रशियासह इतर युरोपियन देशातील प्रवासीही या छोट्या राज्यात येत असतात. या काळात अनेक सेलिब्रिटी, कलाकार, इन्फ्लुएन्सर्स, बिझनेस टायकून, संगीत क्षेत्रातील दिग्गज लोकही गोव्याच्या जादुई वातावरणाचा आनंद घ्यायला येत असतात.उळीं

नाताळ जवळ आला की, गोव्याची हवा बदलते आणि हे वातावरण जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत राहते. चर्च परिसरात आरास सजवली जाते, हॉटेल्समध्ये रोषणाई केली जाते, बाजारपेठांत उत्साह निर्माण होतो. किनारे गजबजतात. गोव्यात नाताळ अनुभवणे म्हणजे फक्त सण साजरा करणे नव्हे; एक जिवंत संस्कृती पाहता आणि अनुभवता येते. वर्ष अखेरच्या स्वागताची तयारी फार पूर्वीच होते. समुद्रकिनारी होणार्या पार्ट्या, खुले संगीत कार्यक्रम, लाईव्ह बँडस्, संगीत नृत्य महोत्सव यांनी गोवा दणाणून जातो. प्रसिद्ध बँडस्, संगीतकार, बॉलीवूड कलाकार, टीव्हीवर चमकणारे चेहरे या कार्यक्रमांना उपस्थिती लावत असतात. गोव्यात या वातावरणात एक वेगळाच तोल साधलेला दिसतो. एका बाजूला आलिशान पंचतारांकित हॉटेल्स, यॉटस्, कॅसिनो, क्रूझ आणि क्लबची धुंद दुनिया तर दुसर्या बाजूला शांत गल्लीबोळ, पांढर्याशुभ्र- चर्च, नारळाच्या बागा आणि छोटी ग्रामीण घरे. या छोट्या गावांत सुरू असलेले धालो, काले, जत्रा. प्रत्येक जण आपापल्या आनंदात रमलेला असतो. पर्यटकांचे एक वेगळे जग आणि स्थानिकांचे त्याहून वेगळे जग.

या दोन्ही जगांचा एक छान तोल राज्याने सावरलेला दिसतो. शहरांच्या धकाधकीतून पळून आलेला प्रवासी गोव्यात आल्यावर जणू काही स्वत:ला परत भेटतो. कोणाला शांत सकाळी समुद्रकिनार्यावरील सूर्यस्पर्श अनुभवायचा असतो तर कोणाला खरेदी करायची असते, कॅफेमध्ये वेळ घालवायचा असतो. समुद्रातली सफर, मसाल्यांच्या बागेची सहल किंवा ऐतिहासिक वाडे, मंदिरे, चर्चेसना भेट द्यायची असते. गोवा हा पर्यटकांसाठी खाण्यापिण्याचाही स्वर्ग आहे, असे म्हणायला हरकत नाही. समुद्री खाद्यपदार्थ, कोकणी मसाले, बेबिंका, सोलकढी, काजू फेणी, पोर्तुगीज प्रभाव असलेले पदार्थ, छोट्या कॅफेपासून मोठ्या पंचतारांकित रेस्टॉरंटस्पर्यंत प्रत्येक ठिकाणी चवीचा उत्सव अनुभवता येतो. नाताळच्या आणि नववर्षाच्या आधीच्या दिवसांत तर खाद्यपदार्थांची विविधता विलक्षण वाढते. सेलिब्रिटी शेफ्स, खास मेन्यू, फॅमिली डिनर्सनी गोवाही आपल्यात हळूहळू उतरू लागतो. गोवा ही एक भावना आहे. नाताळ, नववर्षाच्या या मोसमात तर ती परमोच्च आनंद देत असते. गोव्यातील आठवणी गोळा करण्याचा हा सर्वात चांगला कालावधी आहे. देश- विदेशातील पर्यटक सध्या त्याचा आनंद घेत आहेत. गोव्याची सर्वात मोठी खासियत म्हणजे इथली माणसे. त्यांच्या चेहर्यावरचे हसू, मोकळेढाकळे आदरातिथ्य, विविधतेला दिलेले सुंदर आलिंगनच जणू. येथील उत्सवी जीवनशैली पर्यटकांच्या मनात घर करते. इथे प्रत्येक जण आपला वाटतो. कुणाच्याही जीवनात कोणतीही घाई-गडबड नाही. 'सुशेगाद' ही संकल्पना फक्त शब्द नाही तर इथल्या जीवनाचे तत्त्वज्ञान आहे. म्हणूनच इथे आल्यावर मन शांत होते, मनातला गोंधळ संपून जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो.

# चमत्कारांचे दिवस




मित्रा, नुकत्याच नगरपरिषदांच्या निवडणुका होऊन गेल्या. या निवडणुकांच्या बातम्या पाहिल्यानंतर असे लक्षात आले की, ही निवडणूक म्हणजे चमत्कारांची एकप्रकारची जंत्रीच होती. बरोबर आहे, तू म्हणतोस ते. काही ठिकाणी काही नगरसेवक मात्र एका मताने निवडून आले. या ठिकाणी जो पराभूत झाला असेल त्याला किती वाईट वाटत असेल विचार तरी कर. ऑटो पाठवून दोन मतदार अजून आणले असते, तर आपण निवडून आलो असतो. कुठेतरी हलगर्जीपणा झाला आणि एका मताने हरलो, ही खंत त्याला आयुष्यभर राहील

अरे, हे तर काहीच नाही. काही वॉर्डांमध्ये दोन्ही उमेदवारांना समसमान मते मिळाली. अचूक. सारखे मतदान दोघांनाही मिळाले तर दोघांच्या संमतीने लहान मुलाच्या हाताने 'ईश्वर चिठ्ठी' काढली जाते आणि त्या चिठ्ठीत ज्याचे नाव निघेल तो निवडून आला, असे जाहीर केले जाते. बरोबरी गाठल्यानंतर चिठ्ठीमध्ये आपले नाव न निघणे याला नशिबाने हुलकावणी देणे, असे म्हणतात. याचा अर्थ जवळपास विजय निश्चित झाला होता; परंतु नशिबात नव्हता, असा काहीतरी प्रकार होत असतो.

हे बघ मित्रा, या निवडणुकीतला सगळ्यात मोठा चमत्कार कोकणात झाला आहे. पक्षांतरबंदी किंवा आपण वाटेल ते म्हणत असू. परंतु, घडलेला प्रकार मात्र आश्चर्यचकित करणारा आहे. एका पक्षाची दोन शकले झाली तरी त्यांची एकमेकांशी मैत्री असतेच. एक नगराध्यक्ष या दोनपैकी एका पक्षाकडून उभे होते आणि ते निवडून आले. अर्थात, विरोधात असलेल्या दुसर्या भाऊबंदकी पक्षाने अर्थात त्यांना भरपूर मदत केली होती. आपण कोणत्या चिन्हावर निवडणूक लढवली याचा विसर निवडून आल्याबरोबर अवघ्या काही तासांत विजयी उमेदवाराला पडला आणि ते तत्काळ दुसर्या पक्षात सामील होण्यासाठी निघाले. अवघ्या काही तासांत होणारे हे पक्षांतर मतदारांना आणि इतर राजकारणी लोकांना तोंडात बोटे घालायला लावणारे आहे एवढे निश्चित.

अरे, हे तर काहीच नाही. खरे चमत्कार तर पुढेच आहेत. महिनाभरात विविध महानगरपालिकांच्या निवडणुका येऊ घातल्या आहेत. मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, कोल्हापूर, संभाजीनगर, नागपूर अशा मोठ्या शहरांच्या निवडणुकांमध्ये याहीपेक्षा मोठे चमत्कार मतदारांना आणि जनतेला पाहायला मिळणार आहेत.

मनोरंजनाचे दिवस सुरू होत आहेत मित्रा. दररोज पेपर वाचत जा आणि टी.व्ही.वर बातम्या पाहत जा आणि क्षणाक्षणाला मनोरंजन करून घेत जा. शेवटी प्रत्यक्ष आयुष्यामध्ये मनोरंजन कमी झाले असले तरी राजकारणात मात्र त्याचे प्रमाण वाढत चालले आहे, याविषयी माझ्या मनात तरी काही शंका नाही.

# रोज घरचं जेवण करूनही वजन कमी होत नाहीये?

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक**

आजकाल वाढत्या वेगवेगळ्या आजारांमुळे सामान्यपणे जास्तीत जास्त लोकांना हेच वाटतं की, घरच जेवणच हेल्दी असतं. घरच्या साध्या जेवणातून शरीराला आवश्यक ते पोषण मिळतं. पण खरंच घरचं जेवण पोषण देणारं असतं का? अलिकडेच ऑक्टोबर २०२५ मध्ये समोर




आलेल्या खउचठ च्या एका रिपोर्टमधून भारतीय जेवणाबाबत एक वेगळंच सत्य समोर आलं आहे. जे वाचून आपणही विचारात पडाल.

घरच्या जेवणात पोषणाची कमतरता?

घरचं जेवण स्वच्छतेची काळजी घेऊन बनवलेलं आणि ताजं असतं, त्यामुळे संसर्गाचा धोका कमी असतो. पण विचार न करता त्याला 'हेल्दी' म्हणणे योग्य नाही. आपल्या रोजच्या जेवणात भात, चपाती, डोसा, पोहे, डाळ असे पदार्थ असतात; मात्र यापैकी ७०-८० टक्के भाग कार्बोहायड्रेट्सचा असतो. त्यातच जास्त मीठ आणि तेल वापरल्याने पोषणाचं संतुलन आणखी बिघडतं. अशात शरीराला आवश्यक प्रोटीन, फायबर आणि चांगले फॅट पुरेसे मिळत नाहीत.

**ताट हेल्दी कसं बनवावं?**

**काय कमी करावे?** सर्वात आधी तेल आणि




मिठाच्या प्रमाणाकडे लक्ष द्या. चवीसाठी आपण अनेकदा यांचा अतिरेक करतो. पूर्णपणे बंद करणं अवघड असलं तरी हळूहळू प्रमाण कमी करणं हा चांगला पर्याय आहे. कमी तेल-मिठाचे जेवण हृदयासाठी चांगलं असून वजन आणि रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास मदत करते.

**कशाचे प्रमाण वाढवावे?**

प्रोटीन हा आपल्या आहारातील सर्वात जास्त दुर्लक्षित घटक आहे. शरीराला दररोज प्रति किलो वजनामागे सुमारे १ ग्रॅम प्रोटीन आवश्यक असतं. फिटनेस किंवा मसल बिल्डिंग करत असाल तर ही गरज आणखी वाढू शकते. प्रत्येक जेवणात किमान एक प्रोटीन स्रोत ठेवा उदा. डाळी, पनीर, टोफू, दूध, दही.

**आहारात काय जोडावे?** कच्च्या किंवा हलक्या वाफवलेल्या भाज्या जेवण संतुलित करण्यात मोठी भूमिका बजावतात. त्यात फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे मुबलक असतात. शिवाय भाज्या खाल्ल्याने तेल आणि मिठाचा वापर आपोआप कमी होतो. सॅलड, उकडलेल्या भाज्या किंवा हलकी भाजी रोजच्या जेवणात समाविष्ट करा.

# वांग्याच्या शेतीत ICRIIVR ने शाश्वत IPDM तंत्रज्ञान विकसित, खर्च ५० टक्क्यांनी कमी होईल!

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक**

वांगी उत्पादक शेतकर्‍यांसाठी आनंदाची बातमी आहे. खउ-ठ-भारतीय भाजीपाला संशोधन संस्था (खखतठ), वाराणसी यांनी वांग्यांसाठी एक शाश्वत आणि स्मार्ट खझऊच् (एकात्मिक कीटक आणि रोग व्यवस्थापन) पॅकेज विकसित आणि प्रमाणित केले आहे.

जे कीटक आणि रोग नियंत्रण करण्यासाठी सक्षम आहे. शिवाय रासायनिक फवारण्या ५० टक्क्यांपर्यंत कमी करेल. यामुळे शेतकर्‍यांचा खर्च कमी होईल आणि त्यांचे उत्पन्न वाढीस मदत होणार आहे.

**वांग्यावरील धोकादायक कीड**

वांग्याचे पीक प्रामुख्याने शेंडे आणि फळे पोखरणारे कीटक, तुडतुडे, पांढरी माशी, मावा आणि थ्रिप्स यांसारख्या कीटकांमुळे प्रभावित होते. जे पानांचे नुकसान करून, फळे खराब करून अधिक नुकसान करतात. या कीटकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी एकात्मिक कीटक व्यवस्थापन (खझच्) पद्धती वापरल्या जातात.

ज्यामध्ये फेरोमोन ट्रॅप, कडुनिंब-आधारित कीटकनाशके, ॲग्रोस्टार रॅपिझेन सारखे रासायनिक द्रावण आणि संक्रमित भाग काढून टाकणे यांचा समावेश आहे. वाराणसी, मिर्झापूर आणि भदोही येथे आयपीडीएम तंत्रज्ञानाची यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे. यामुळे शेतकर्‍यांना खूप मदत होईल आणि त्यांच्या पिकांचे संरक्षण होईल.

हे आयपीडीएम तंत्रज्ञान कसे काम करते?

हे पॅकेज जैविक, लागवडीखालील आणि गरजेनुसार रासायनिक नियंत्रणाचे संतुलित मिश्रण आहे.

प्रमुख उपाय

ट्रायकोडर्मनि बियाणे प्रक्रिया - लवकर रोग रोखते.

ोपे बुडवणे - लागवडीपूर्वी प्रारंभिक कीटक आणि रोग




नियंत्रण.

संक्रमित कोंब आणि फळे आठवड्याला काढून टाकणे - बोअररचा प्रसार रोखते.

प्रति हेक्टर २५-३० फेरोमोन सापळे - कोंब आणि फळ बोअरर नियंत्रणासाठी सर्वात प्रभावी पद्धत.

स्मार्ट स्प्रे - फक्त गरज असेल तेव्हाच

कीटकांची पातळी आर्थिक दुखापत पातळी (एढङ) पेक्षा जास्त असेल, म्हणजेच ५%. तेव्हाच फवारणी करा.

बोअररसाठी लक्षित स्प्रे

पांढरी माशी असल्यासच औषधाचा वापर

अझाडिरॅक्टिनपासून सुरक्षित आणि पर्यावरणपूरक संरक्षण

संक्रमित फळे आणि लहान पानांची झाडे काढून टाकणे आवश्यक आहे.

शेतकर्‍यांसाठी प्रमुख फायदे

प्रमुख कीटक आणि रोगांचे मजबूत नियंत्रण

२१-२७ वरून अंदाजे १० फवारण्या कमी केल्या

रासायनिक खर्च कमी केला

उत्पादन सुरक्षित, पर्यावरणपूरक आणि शेतकरी-अनुकूल आहे


खउ-ठ-खखतठ कडून मिळालेल्या या तंत्रज्ञानाला शाश्वत शेतीच्या दिशेने एक मोठे पाऊल मानले जाते आणि येत्या हंगामात वांगी उत्पादक शेतकर्‍यांना त्याचा मोठा फायदा होईल अशी अपेक्षा आहे.

# विद्यार्थ्यांनो! मानसिक व शारीरिक स्वास्थ्य सांभाळा- कुलगुरू

## विद्यापीठात फिटनेस वीकचे कुलगुरूंच्याहस्ते उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती-** आजच्या स्पर्धेच्या व धकाधकीच्या युगात मानसिक व शारीरिक स्वास्थ्य टिकविणे सर्वांचे प्रथम कर्तव्य झाले आहे. स्पर्धेला सामोरे जातांना विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमतेवर परिणाम होऊ नये, तो निरोगी आणि सुदृढ रहावा, म्हणून विद्यापीठाच्यावतीने फिटनेस कॅम्पचे केलेले आयोजन आजची गरज असून विद्यार्थ्यांनी आपले मानसिक व शारीरिक स्वास्थ्य सांभाळावे आणि फिटनेस कॅम्पमध्ये आपली शारीरिक तपासणी करुन घ्यावी, असे आवाहनात्मक प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. विद्यापीठातील पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्यावतीने सहा दिवसीय शारीरिक कार्यक्षमता तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून त्याचे उद्घाटनप्रसंगी कुलगुरू बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी श्री प्रकाश मेश्राम, फिट इंडियाचे श्री उज्ज्वल जाधव, पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत. उपस्थित होते. फित कापून फिटनेस वीकचे उद्घाटन झाल्याची घोषणा कुलगुरू यांनी केली. मार्गदर्शन करतांना कुलगुरू पुढे म्हणाले, आजच्या युगात करिअर घडविण्याच्या आणि पैसे कमविण्याच्या मागे धावतांना आरोग्याकडे दुर्लक्ष होतांना दिसत आहे. शुगर व बी.पी.च्या रुग्णांमध्ये मोठएा प्रमाणावर होत असलेल्या वाढीमुळे भारत भारत कॅपिटल होते की काय? अशी भीती निर्माण झाली आहे. तरुणांमध्ये सुध्दा हे आजार पसरत असून ते चिंताजनक आहे. तरी सर्वांनी आपले मानसिक व शारीरिक स्वास्थ्य सुदृढ ठेवण्यासाठी अशाप्रकारच्या फिटनेस कॅम्पमध्ये आपली शारीरिक क्षमता तपासून घ्यावी असे आवाहन करुन त्यांनी शुभेच्छा



दिल्या. महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी श्री प्रकाश मेश्राम म्हणाले, प्रत्येकाने फक्त स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष देवून चालणार नाही, तर आरोग्य दूत म्हणून निरोगी आरोग्याचा संदेश समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. तरच या फिटनेस कॅम्पचे उद्दिष्ट ख-या अर्थाने यशस्वी होईल. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी प्रत्यक्ष चाचणी केंद्राची पाहणी केली व स्वत: शारीरिक चाचणी करुन घेतली. ३ जानेवारी पर्यंत चालणा-या या शारीरिक क्षमता चाचणीमध्ये बी.एम.आय., स्टॅबिलिटी, ग्रीप स्ट्रेंग्थ, स्ट्रेंग्थ एन्डुरन्स, रियाक्शन टाईम, फॅट पर्सेंटेज, व्ही.ओ.२ मॅक्स, एक्झॉल कॅपेसिटी, ब्लड प्रेशर, हिमोग्लोबीन, फ्लेक्झिबिलीटी, फिंगर डेक्स्टेरिटी, फोर्टी यार्ड शटल रन, हॅंड-आय-को-ऑर्डीनेशन, फुट-आय-को-ऑर्डीनेशन,होल बॉडी को-ऑर्डीनेशन, मेमरी स्कोप अशा चाचणी करण्यात येणार आहेत. विद्यापीठातील सर्व अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, शिक्षकांकरिता ही चाचणी नि:शुल्क असून सर्वांनी आपली शारीरिक क्षमता चाचणी करुन घ्यावी, अशी विनंती पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी प्रास्ताविकेतून केली व आयोजनामागील भूमिका मांडली. सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संचालन निखिलकुमार डोंगरे, अमिता डुंग डुंग व मुशरफ अली, तर आभार रोजा गुरुंग हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. हेमंतराज कावरे, डॉ. अनुल बिजवे, डॉ. विजय निमकर, डॉ. निलेश इंगोले, डॉ. सौरभ त्रिपाठी, कु. सविता बावनथडे यांच्या मार्गदर्शनाखाली शारीरिक शिक्षण विभागातील प्रथम व व्दितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# जानेवारीपासून रेशन धान्य वाटपात पुन्हा बदल

## नववर्षात आता कुणाला मिळणार किती धान्य?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती-** शिधापत्रिकाधारकांना नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यांत गव्हाबरोबरच ज्वारीचे वितरण करण्यात आले होते. यात गहू, ज्वारी आणि तांदळाचा पुरवठा केला आहे.

नववर्षात रेशनवर ज्वारी बंद होणार असून, धान्य वाटपात पुन्हा एकदा बदल केला आहे. त्यामुळे आता गहू ३ किलो आणि तांदूळ २ किलो मिळणार आहे. मागील दोन महिने अंत्योदय योजनेंतर्गत प्रत्येकी पाच किलो गहू व पाच किलो ज्वारी, तसेच २५ किलो तांदूळ देण्यात आला.तर प्राधान्य कुटुंबांना यापूर्वी मिळणाऱ्या दोन किलो गहू व तीन किलो तांदळाऐवजी एक किलो गहू व एक किलो ज्वारीचे वितरण केले होते. म्हणजेच, पूर्वीच्या गहूऐवजी गहू व ज्वारीचे संयुक्त वाटप केले होते.

नोव्हेंबरपासून लाभार्थ्यांना ज्वारी मिळत होती. जानेवारीपासून धान्य वाटपात पुन्हा बदल केले जाणार आहे. दरम्यान, राज्यातील रेशनधारकांसाठी नववर्षात महत्त्वाचा बदल होणार आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनांमधील नवीन धान्यप्रमाण पुन्हा लागू करण्यात येणार आहे. जानेवारी २०२६ पासून अंत्योदय योजनेत २१ किलो गहू व १४ किलो तांदूळ, असे एकूण ३५ किलो धान्य मिळणार आहे. प्राधान्य कुटुंब योजनेत प्रत्येकी दरमहा दोन किलो तांदूळ व तीन किलो गहू दिला जाणार आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# मनपा निवडणूक नामांकनाचा आज शेवटचा दिवस

## सोमवारला तब्बल २७३ उमेदवारांचे नामांकन दाखल, ३११ अर्जाची उचल, एकूण ३०२४ नामांकन उचल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

महापालिका निवडणुकीसाठी नामांकनाचा मंगळवार शेवटचा दिवस असून सोमवारला सातही झोनमध्ये नामांकन उचल आणि भरणाऱ्यांची समर्थकांसह मोठी गर्दी उसळली होती. सोमवार २९ डिसेंबर रोजी २७३ उमेदवारांनी नामांकन दाखल केले असून ३११ इच्छुकांनी नामांकनाची उचल केली. त्यामुळे पाच दिवसात एकूण ३०८ नामांकन दाखल तर ३०२४ नामांकनाची उचल करण्यात आली. विशेष म्हणजे सोमवारला अनेक दिग्गज नेते व माजी पदाधिकाऱ्यांनी नामांकन



दाखल केले.

यामध्ये शनिवारला अनेक दिग्गजांनी नामांकन दाखल केले. यामध्ये माजी महापौर विलास इंगोले, बबलू शेखावत, प्रकाश बनसोड, सुरेखा लुंगारे, प्रशांत वानखडे, राजेंद्र महल्ले, बंडू हिवसे, जयश्री कुडेकर, मयुरी जंवजाळ, राजेश शिरभाते, जयश्री डहाके, राधा कुरील, अर्चना इंगोले, स्वाती निस्ताने, बाळू भूयार, चंद्रकांत बोमरे, सुनिता भेले, प्रवीण हरमकर, ललिता रतावा, विवेक कलोती, विशाखा हरमकर, प्रशांत धर्माळे, अर्पना ठाकरे आदींचा समावेश होता.विशेष म्हणजे झोन १ मधून सोमवारला ३८. झोन-२ मधून ३२, झोन ३ मधून ५०, झोन ४ मधून ४५, झोनपाचमधून ३३, झोन ६ मधून ३७ आणिझोन ७ मधून ३८ अशा एकूण २७३ इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केलें.

तर सोमवारलाझोन १ मधून ५३, झोन-२ मधून ३८, झोन ३ मधून ५०, झोन ४ मधून ४५ , झोन पाच मधून ४०, झोन ६ मधून ३६ आणि झोन ७ मधून ४९ अशा एकूण ३११ इच्छुकांनी उमेदवारी अर्जाची उचल केली.दरम्यान सातही झोन कार्यालयात एकूण ३०८ इच्छुकांनी नामांकन दाखल केले. अशा प्रकारे नामांकनाच्या ५ दिवसात एकूण ३०२४ इच्छुकांनी उमेदवारी अर्जाची उचल केली. मंगळवार ३० डिसेंबर हा नामांकन उचल आणि भरण्याचा शेवटचादिवस आहे.

### सातही झोनवर तुफान गर्दी

दाखल सोमवारला नामांकन करण्यासाठी आणि उचल करण्यासाठी सर्वच राजकीय पक्षाचे व स्वतंत्र इच्छुकांनी सातहीझोनवर मोठी गर्दी केली होती. त्यामुळे काही ठिकाणी रांगा लागल्या होत्या. नामांकनाची वेळ झाल्यानंतर संबंधितांना कूपन देण्यात आले होते. त्यानंतर रात्री पर्यंत नामांकन प्रक्रिया सुरु होती.

# उद्याला शहरातील तिन्ही उड्डाण पुलावर वाहतुकीस बंद

## ३१ डिसेंबर ला शहरात राहणार १०२१ पोलिसांचा बंदोबस्त

### ३९ ठिकाणी नाकाबंदी-डंकनअॅन्ड ड्राईव्ह मोहीम राबविण्यात येणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे ३१ डिसेंबरला जल्लोषात स्वागत केले जाते. यादिवशी मोठ्या प्रमाणात नागरीक नववर्षाच्या स्वागताकरीता वाहनांसह रस्त्यावर येतात. अशावेळी कोणत्याही प्रकारची जिवितहानी किवा मालमत्तेचे नुकसान होवू नये करीता कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस आयुक्तालयाकडून एकूण ३९ ठिकाणी नाकाबंदी तसेच ठिकठिकाणी तपासणी करण्यात येणार आहे. या बंदोबस्ताकरीता सीपी राकेश ओला यांच्या मार्गदर्शनात ०३ पोलीस उपायुक्त, ०३ सहा. पोलीस आयुक्त ९५ पोलीस अधिकारीव ९२० पोलीस अंमलदार ( पो.ठाणे, वाहतूक विभाग, गुन्हेशाखा व इतर विविध पथके नेमण्यात येणार आहे.पोलीस विभागाकडून शहरांच्या प्रमुख चौकात तसेच विविध पोलीस ठाणेच्या हद्दीतील आवश्यक ठिकाणी



बॅरीकेटींगद्वारे नाकाबंदी करण्यात येणार आहे. तसेच सर्वतिन्ही उड्डाणपुलावरून वाहतूकीस बंदी असणार आहे. ड्रंकन अॅन्ड ड्राईव्ह मोहीम राबविण्यात येणार आहे.स्टंट रायडींग, भरधाव वेगाने वाहन चालविणा-या वाहनधारकांविरुध्द कारवाई करणेकरीता इन्टरसेप्टर वाहन तैनात करण्यात येणार आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करुन वाहन चालविणारे वाहन चालकांवर मोटार वाहन कायदा, महाराष्ट्र दारुबंदी कायदा, भारतीय न्याय संहिता कायद्यान्वये कारवाई करण्यात येईल. पोलींसाव्दारे संपुर्ण शहरामध्ये पायदळ व मोटर सायकलद्वारे पेट्रोलिग करण्यात येईल.पोलिसांची परवानगी आवश्यक महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग यांनी निर्गमित केलेल्या निर्देशनाप्रमाणे बंद जागा खेरीज इतर ठिकाणी ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक इत्यादीध्वनीची मर्यादाराखूनसकाळी ०६.०० वा. ते रात्री १२.०० वा. पर्यंत सुट जाहीर करण्यात आलेली आहे. तसेच ३१ डिसेंबर निमित्त नववर्षांच्या पूर्वसंध्येला हॉटेल, लॉन व इतर ठिकाणी ऑर्केस्टा वाद्य वाजविणे किवा इतर कोणत्याही प्रकारचे कार्यक्रम आयोजित करतांना पोलीस विभागाची परवानगी घेणे आवश्यक राहील.

# नदीकाठचा कठडा खचला

## ट्रॅक्टर नदीत कोसळला

### शेतकऱ्याचा जागीच दुर्दैवी मृत्यू, मजूर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक दि३०अचलपूर :**

शेतीची दिवसभराची कष्टाची मेहनत संपवून घरी परतणाऱ्या एका शेतकऱ्यावर काळाने घाला घातल्याची हृदयद्रावक घटना अचलपूर तालुक्यातील कारणबाग शेत शिवारात घडली. प्रमोद शिवहरी मेहरे उर्फ बाबू (रा. नौबागपुरा, अचलपूर), वय ४० वर्षे यांचा ट्रॅक्टर अपघातात जागीच मृत्यू झाला असून, त्यांच्यासोबत ट्रॅक्टरवर बसलेला गुलाब नामक मजूर गंभीर जखमी झाला आहे.प्रमोद मेहरे यांनी गिरीष खंडेलवाल (रा. च्यावलमंडी) यांच्या कारणबाग शेत शिवारातील शेती लागवडीचे काम घेतले होते. आज सोमवारी दुपारी सुमारे ४ वाजताच्या सुमारास शेतातील कापूस वेचून कापसाचे गाठोडे ट्रॅक्टरवर घेऊन ते घरी परतत होते. मात्र सापण नदी पात्राजवळून जात असताना नदीकाठचा कठडा अचानक खचला आणि ट्रॅक्टर थेट नदीत कोसळला.या भीषण अपघातात ट्रॅक्टरखाली दबल्या गेल्याने प्रमोद मेहरे यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्यासोबत ट्रॅक्टरवर बसलेला गुलाब हा मजूर गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर उपचार



सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र तोपर्यंत खूप उशीर झाला होता.प्रमोद मेहरे हे कष्टकरी, मनमिळावू व कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. त्यांच्या अकाली मृत्यूने नौबागपुरा परिसरात शोककळा पसरली असून, कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. शेतीकामासाठी रोज जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न या घटनेमुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे.या दुर्दैवी घटनेबाबत पुढील तपास पोलीस करत आहे.

# अमरावती शहरात मंदिर चोरी करणारा रेकॉर्डवरील गुन्हेगार जेरबंद

### दोन गुन्ह्यांची उकल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

अमरावती शहरात घरफोडी व मंदिर चोरीच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते. त्या आदेशानुसार गुन्हे शाखा अमरावती शहराच्या पथकाने प्रभावी कारवाई करत मंदिर चोरी करणाऱ्या रेकॉर्डवरील एका गुन्हेगाराला ताब्यात घेऊन दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत.गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली, पोउपनि सागर हटवार व पथकातील अधिकारी -अंमलदार समांतर तपास करीत असताना, पोलीस स्टेशन खोलापुरी गेट येथे दाखल गुन्ह्यातील आरोपी गांधी चौक परिसरात फिरत असल्याची खात्रीशीर माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली.त्या माहिती च्या आधारे गांधी चौक परिसर ातून गोपाल मोहन युवनाते (वय ४२, रा. पांढरघाटी, ता. वरूड, जि. अमरावती) यास ताब्यात घेण्यात आले. बारकाईने चौकशी केली असता, त्याने त्याचा साथीदार रामचंद्र युवनाते याच्या



सह अमरावती शहरातील पोलीस स्टेशन खोलापुरी गेट व बडनेरा हद्दीत मंदिर चोरी केल्याची कबुली दिली. मात्र त्याचा साथीदार रामचंद्र युवनाते हा फरार असून त्याचा शोध सुरू आहे.ताब्यात घेतलेल्या आरोपी कडून अमरावती शहरातील खालील दोन गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे.ही कारवाई मा. पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (मुख्यालय ) रमेश धुमाळ, तसेच सपोआ गुन्हे शाखा शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार दीपक सुंदरकर, सचिन बहाळे, जहीर शेख, अतुल संभे, सुरज चव्हाण, राजीक रायलीवाले, निखील गेडाम व संदीप चव्हाण यांनी सहभाग घेतला.

# ३१ डिसेंबरला मुसळधार पाऊस

## तब्बल ५ राज्यात अलर्ट जारी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

वातावरणात सातत्याने बदल होताना दिसतोय. सकाळी कडाक्याची थंडी तर दुपारी कडक उन्ह अशी स्थिती बघायला मिळतंय. देशातील काही भागांमध्ये अजूनही पाऊस कोसळताना दिसत आहे. उत्तरेकडे थंडी वाढल्याने राज्यात थंड लहरी येत असल्याने पारा घसरताना दिसत आहे. आता राज्यात लवकर गुलाबी थंडीचा आगमन होणार आहे. जवळपास संपूर्ण डिसेंबर महिना राज्यात थंडी कायम राहिली. नोव्हेंबरच्या सुरूवातीला राज्यात पाऊस होता. दिवाळीतही पाऊस कोसळताना दिसला. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यात पुन्हा एकदा थंडी वाढण्याचे संकेत आहेत. कडाक्याची थंडी राज्यात पडेल.



पंजाबच्या हिस्सारमध्ये सर्वात कमी तापमानाची देशात नोंद झाली. तिथे २.१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

डिसेंबर महिना संपत आला असतानाही देशातील काही भागांमध्ये मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामध्येच ३१ डिसेंबर २०२५ साठी भारतीय हवामान विभागाने मोठा पावसाचा इशारा ५ राज्यांना दिला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ३१ डिसेंबरच्या संध्याकाळपासून उत्तर भारतातील पाच राज्यांमध्ये हवामानाची स्थिती वाईट होण्याची शक्यता आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, दिल्ली, हरियाणा आणि काश्मीर या ठिकाणी पावसाचा इशारा देण्यात आला.

# चिखलदरा येथील कार्यालयातील कामकाज ठप्प

### उपविभागीय जलसंधारण अधिकारी गायब

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०चिखलदरा :**

येथील जिल्हा परिषद उपविभागीय (लघुपाट बंधारे/ल.पा.) जलसंधारण अधिकारी हे गेल्या काही दिवसांपासून बेपत्ता असून त्यांच्या कार्यालयाला कुलूप लावलेले आढळून आले आहे. अधिकारी कार्यालयात अनुपस्थित असल्यामुळे संबंधित कामकाज पूर्णपणे ठप्प झाले असून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. जलसंधारण विभागाशी संबंधित विविध योजना, तक्रारी व प्रशासकीयकामांसाठी येणाऱ्या नागरिकांना कोणतीही माहिती अथवा सेवा मिळत नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित अधिकारी कार्यालयात उपस्थित नसणे व कोणतीहीपूर्वसूचना न देता कार्यालय बंद ठेवणे हे गंभीर स्वरूपाचे मानले जात आहे.या



प्रकरणाची तात्काळ चौकशी करून संबंधित अधिकाऱ्याबाबत योग्य ती कारवाई करावी, तसेच विभागाचे कामकाज सुरळीत सुरू करण्यासाठी तातडीने पर्यायी व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी केली आहे.याकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष देऊन नागरिकांची होणारी गैरसोय दूर करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# चायनीज मांजा विरोधात २५ ठिकाणी तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

झोन क्र.१ अंतर्गत रामपुरी कॅम्प परिसरातील प्रवीण नगर, शेगाव नाका भागात चायनीज मांजा व प्लास्टिक विरोधात सोमवार २९ रोजी विशेष तपासणी मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेदरम्यान पतंग विक्री करणाऱ्या आस्थापनांमध्ये चायनीज मांजा तपासणी, प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी करण्यात आली. एकूण २५ आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून तपासणीअंती अनेक आस्थापनांमध्ये कापडी, कागदी पिशव्या तसेच ५१ मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीचे प्लास्टिक वापरात असल्याचे आढळून आले.

तसेच ८ पतंग विक्री करणाऱ्या आस्थापनांची स्वतंत्र तपासणी करण्यात आली असता कुठेही चायनीज मांजा विक्री होत असल्याचे आढळले नाही.



संबंधित आस्थापनांमध्ये बरेली मांजा, साधा तागा तसेच पतंग व चरख्यांची विक्री सुरू असल्याचे निदर्शनासआले. मनपा आयुक्त सौम्या शर्मा अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव व सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले (झोन क्र. १) यांच्या निर्देशानुसार आयोजित मोहिमेदरम्यान एका आस्थापनेत डस्टबिन नसल्याने तसेच काही ठिकाणी उघड्यावर कचरा टाकल्याबद्दल प्रवीण गुप्ता व आशिष इंगळे यांच्याकडून प्रत्येकी १ हजार रु. असा एकूण २ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.या कारवाईत प्लास्टिक निर्मूलन नोडल अधिकारी विनोद टांक, स्वास्थ निरीक्षक सचिन सैनी तसेच सय्यद, इम्रान खान, आकिब शेख, प्रविण उसरे, निखिल खंगाळे व रोहित हडाले उपस्थित होते. महानगरपालिकेद्वारे शहरात चायनीज मांजा व प्लास्टिक वापरास प्रतिबंध करण्यासाठी अशा तपासणी मोहिमा पुढेही सुरू राहणार सांगण्यात आले.

# मुख्यमंत्र्यांच्या विश्वासू नेत्याला भाजपने उमेदवारी नाकारली, शिलेदाराने दिला राजीनामा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०नागपूर-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नागपूरमधील विश्वासू असलेले देवदत्त डेहनकर यांना भाजपने उमेदवारी नाकारली आहे. देवदत्त नागपूर महानगरपालिकेतून निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यासाठी उत्सुक होते. त्यासाठी त्यांनी तयारीही केली होती. पण सोमवारी रात्री ऐनवेळी त्यांची उमेदवारी नाकारण्यात आली. भाजपने उमदेवारी नाकारल्यानंतर देवदत्त डेहनकर यांनी पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. देवदत्त यांच्या राजीनाम्याची नागपूरच्या राजकारणात जोरदार चर्चा सुरू आहे.

नागपूर महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाकडून तिकीट नाकारल्याने देवदत्त डेहनकर नाराज झाले. त्यांनी सोशल मीडियावरून भाजपच्या सक्रिय सदस्तवाचा राजीनामा दिला. तसेच भाजपच्या अनेक ग्रुपवर मॅसेज टाकून नाराजी व्यक्त केल्याचे समोर आले आहे. एकीकडे जागावाटपाचा तिढा सुटलेला नसताना भाजपमधील अंतर्गत नाराजी उफाळून आली आहे. देवदत्त डेहनकर यांच्या राजीनाम्यामुळे नागपूरच्या राजकीय वर्तवळात खळबळ उडाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक ३६ मधून देवदत्त डेहनकर हे उमेदवारीसाठी इच्छुक होते. ते मागील काही दिवसांपासून प्रभाग मध्ये सक्रियपणे उमेदवारी मिळेल या अनुषंगाने कामही करत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जवळचे मानले जाणारे देवा डेहनकर यांनी अचानकपणे



प्रभाग क्रमांक ३६ मधून दुसऱ्याला उमेदवारी मिळाल्याच्या कारणावरून नाराजी व्यक्त करत सक्रिय सदस्य पदाचा राजीनामा दिल्याची माहिती आहे.

भाजपकडून आता हा राजीनामा स्वीकारला जाईल की त्यांची मनधरणी केल्या जाईल, हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. एकीकडे जागावाटपाचा तिढा सुटलेला नसताना भाजपमधील अंतर्गत नाराजी उफाळून आली आहे. देवदत्त डेहनकर यांच्या राजीनाम्यामुळे नागपूरच्या राजकीय वर्तवळात खळबळ उडाली आहे. त्यामुळे भाजपचे पदाधिकारी देवा डेहनकर नाराजी दूर करण्यात यशस्वी होतं का हे सुद्धा पहावं लागणार आहे. देवा डेहनकर यांनी पक्षाच्या सर्वच पदाचा राजीनामा दिलाय. देवदत्त डेहनकर हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जवळचे समजले जातात.

मागील अनेक वर्षांपासून ते युवा मोर्चा आणि भाजपच्या माध्यमातून पक्ष वाढीसाठी काम करत होते. तिकीट नाकारल्याने त्यांनी राजीनामा दिला आहे. याचा भाजपला फटका बसू शकतो, असे नागपूरमधील काही भाजप कार्यकर्त्यांनी सांगितले.

## महाविकास आघाडीचे नागपुरात ठरले

# काँग्रेसला १२९, शरद पवार गट १२ अन् ठाकरे गटाला १० जागा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०नागपूर** – नागपूर महापालिकेच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचे जागावाटप निश्चित झाले आहे. या निर्णयानुसार, काँग्रेस सर्वाधिक १२९ जागांवर निवडणूक लढवणार असून, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला अनुक्रमे १२ व १० जागा सोडण्यात आल्या आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, काँग्रेसच्या ३ जागांवर तुतारीचे उमेदवार लढणार आहेत. याची अधिकृत घोषणा आज होण्याची शक्यता आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, काँग्रेसचे नागपूर शहराध्यक्ष विकास ठाकरे यांच्या निवासस्थानी रविवारी रात्री महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक झाली. या बैठकीला राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे शहराध्यक्ष दुनेश्वर पेठे, माजी आमदार प्रकाश गजभिये, शेखर सावरबांधे, ठाकरे गटाचे लोकसभा प्रमुख



सतीश हरडे, जिल्हाप्रमुख प्रमोद मानमोडे, किशोर कुमेरिया, काँग्रेस आमदार अभिजित वंजारी, गिरीश पांडव, बंटी शेळके, उमाकांत अग्निहोत्री, अतुल कोटेचा, शेख हुसैन आदी नेते उपस्थित होते.

**शरद पवार गटाची १२ जागांवर तडजोड–** प्रस्तुत बैठकीत राष्ट्रवादीने २४ जागांची मागणी केली. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात किमान ४ जागा पक्षाला सोडल्या जाव्यात असा आग्रह त्यांनी धरला. पण काँग्रेस नेते १० जागांच्या पुढे सरकण्यास तयार नव्हते. यावेळी दोन्ही पक्षांनी आपापली बाजू पटवून देण्याचा प्रयत्न केला. पण हा तिढा सुटत नव्हता. शेवटी ही चर्चा थांबून हे पक्ष स्वबळाच्या दिशेने जातात की काय? अशी स्थिती निर्माण झाली. पण ऐनवेळी १२ जागांवर तडजोड झाली आणि मुद्दा निकाली झाला. शरद पवार गटाला आणखी झुकते माप देत काँग्रेसने आपल्या ३ जागांवर राष्ट्रवादीचे उमेदवार लढतील असा तोडगा या प्रकरणी काढण्यात आला.

**ठाकरे गटाने मागितल्या ३० जागा, पण मिळाल्या १०**

दुसरीकडे, ठाकरे गटाने काँग्रेसकडे ३० जागांची मागणी केली. पण त्यांना अवघ्या १० जागा सोडण्यात आल्या. दुनेश्वर पेठे यांनी याविषयी एका वृत्तपत्राशी बोलताना सांगितले, आम्ही जास्त जागा मागितल्या, पण काँग्रेसने १० हून अधिक जागा सोडता येणार नाहीत अशी स्पष्ट भूमिका घेतली. त्यानंतर विधानसभानिहाय जागांवर चर्चा झाली. त्यात अखेरीस १० जागा देण्याची तयारी काँग्रेसने दर्शवली. अखेर आम्ही त्यावर तयार झालो.

# चंद्रपुरात दोन 'वारांच्या' भांडणात तिसऱ्याचा लाभ?

## भाजपमधील नाराजांवर काँग्रेसचा डोळा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०चंद्रपूर–**

चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी निश्चित करण्यावरून भाजपचे दोन दिग्गज नेते सुधीर मुनगंटीवार आणि किशोर जोरगेवार यांच्यात सुरू झालेला वाद आता विकोपाला गेला आहे. या दोन 'वारांच्या' भांडणामुळे भाजपमध्ये मोठी अस्वस्थता निर्माण झाली असून, याचाच फायदा घेण्यासाठी काँग्रेसने आपली दारे उघडली आहेत. दोन 'वारांच्या' भांडणात भाजप मधील अनेक इच्छुक आता काँग्रेसकडे डोकावून पाहत आहेत, असा खोचक टोला लगावत, आम्ही तडजोड करून नाराजांना उमेदवारी देण्यास तयार



असल्याचे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले.

चंद्रपूर महापालिकेच्या निवडणुकीत कोणाचे पारडे जड राहणार, यावरून मुनगंटीवार आणि जोरगेवार यांच्यात गेल्या काही दिवसांपासून सुप्त संघर्ष सुरू होता. नुकत्याच झालेल्या पक्षाच्या महत्त्वपूर्ण बैठकीत हा वाद उघडपणे समोर आला. शहरातील विविध प्रभागांमध्ये उमेदवारी देताना दोन्ही नेत्यांनी आपापल्या समर्थकांची आणि कट्टर कार्यकर्त्यांची नावे रेटून धरली. बहुतांश प्रभागांमध्ये दोघांनीही वेगवेगळ्या नावांसाठी शिफारस केल्यामुळे उमेदवारांची यादी अंतिम होऊ शकली नाही. वादावर कोणताही तोडगा न निघाल्याने पक्षाने आता पुढील दोन दिवसांत सर्व इच्छुक उमेदवारांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. या सर्वेक्षणाच्या निकालानंतरच अंतिम नावे निश्चित केली जाणार आहेत.

### राजकीय गणिते बदलणार?

विजय वडेट्टीवार यांनी उघडपणे 'तडजोड' आणि 'इच्छुकांचे स्वागत' करण्याची भाषा केल्यामुळे भाजपच्या गोटात चिंतेचे वातावरण आहे. भाजपमधील जुन्या निष्ठावंतांना डावलले गेल्यास किंवा जोरगेवार–मुनगंटीवार वादात कोणाचा पत्ता कट झाल्यास, ते उमेदवार काँग्रेसचा हात धरण्याची दाट शक्यता आहे. अशा परिस्थितीत चंद्रपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीचे संपूर्ण गणित बदलू शकते.

**वडेट्टीवारांची 'मेरिट'वर आधारित खेळी–** भाजपमधील या अंतर्गत कलहावर प्रतिक्रिया देताना विजय वडेट्टीवार यांनी काँग्रेसची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, भाजपमध्ये सध्या प्रचंड अस्वस्थता आहे. जे इच्छुक तिकिटासाठी आमच्याकडे संपर्क करत आहेत, त्यांच्याबाबत आम्ही सकारात्मक आहोत. मात्र, उमेदवारी देताना आम्ही संबंधित इच्छुकाची प्रतिमा आणि कामाचा आवाका असे महत्त्वाचे निकष लावणार आहोत. निवडून येण्याची क्षमता. ज्या ठिकाणी काँग्रेसची स्थिती थोडी कमकुवत आहे किंवा जिथे आम्हाला विजयाची खात्री कमी आहे, अशा ठिकाणी आम्ही भाजपच्या इच्छुकांसोबत तडजोड करून त्यांना उमेदवारी देण्यास तयार आहोत.

# संशयाचं भूत राहुलच्या डोक्यात शिरलं, गाढ झोपलेल्या बायको अन् मुलाची कुऱ्हाडीने हत्या

**दुहेरी हत्याकांडाने महाराष्ट्र हादरला**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर शहरातील शिक्षक कॉलनी, वार्ड नं १ येथे रात्री एक धक्कादायक घटना घडली. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत पतीने पत्नी व चार वर्षांच्या चिमुकल्या मुलाची कुऱ्हाडीने वार करून हत्या केल्याची घटना समोर आली असून, यामुळे संपूर्ण मेहकर शहर हादरून गेले आहे.

या घटनेत पत्नी रूपाली राहुल म्हस्के (वय ३०) आणि त्यांचा चार वर्षांचा मुलगा रियांश राहुल म्हस्के यांचा मृत्यू झाला आहे. आरोपी पतीचे नाव राहुल हरी म्हस्के (वय ३५) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रात्री कुटुंबातील सर्व सदस्य झोपेत असताना आरोपीने पत्नी व मुलावर कुऱ्हाडीने हल्ला केला. या हल्ल्यात मुलाचा जागीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या रूपाली यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे नेत असताना जालना परिसरात त्यांचा मृत्यू झाला आहे.



राहुल म्हस्के यांच्यासह त्यांचे आई–वडील व आजी असे एकूण सहा जण शिक्षक कॉलनीतील घरात वास्तव्यास होते. घटनेची माहिती मिळताच मेहकर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे, ठाणेदार व्यंकटेश्वर आलेवार यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली.

मेहकर पोलिसांनी आरोपी राहुल म्हस्के याला ताब्यात घेतले असून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेमागील नेमके कारण, संशयाची पार्श्वभूमी आणि आरोपीची मानसिक स्थिती याबाबत तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. चार वर्षांच्या निष्पाप रियांशच्या मृत्यूमुळे शहरात हळहळ व्यक्त होत असून, घरगुती संशय आणि मानसिक अस्थैर्याचे भीषण वास्तव या घटनेतून पुन्हा एकदा समोर आले आहेत.

# हिंगोली भूकंपाने हादरलं

## साखर झोपेत असताना १५ गावात जोरदार धक्के

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०हिंगोली** – हिंगोली जिल्ह्याला पुन्हा एकदा भूकंपाचे हादरे बसले आहेत. पहाटे सर्वजण साखरझोपेत असताना हिंगोलीच्या औंढा व कळमनुरी तालुक्यातील १५ पेक्षा अधिक गावात हादरे बसले. भूकंपाची तीव्रता ३.५ रेश्टर स्केल इतकी नोंदण्यात आली आहे. कडाक्याच्या थंडीमध्ये नागरिक झोपेत असताना भूकंप झाल्याने १५ तालुक्यात एकच धावपळ उडाली. नागरिकांनी घराबाहेर पळ काढला. काही सेकंदासाठी जमीन हादरली पण त्यामुळे एकच खळबळ उडाली. भूकंपाच्या धक्या नंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.नागरिकांनी भूकंपाच्या वेळी योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.





मंगळवारी सकाळी पाच वाजून ५५ मिनिटांनी हिंगोलीमध्ये भूकंपाचा धक्का जाणवला. दरम्यान कळमनुरी तालुक्यातील माळधामणी गावात सुरेश बांगर यांच्या दुकानापुढे लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात भूकंपाचे दृश्य कैद झाले आहे. या आधी देखील पिंपळदरी पांगरा शिंदे ,बोल्डा, रामेश्वर, आमदारी या गावातील परिसराला भूकंपाचे हादरे बसले आहेत. आज सकाळी झालेल्या या भूकंपाची लातूर येथील भूमापक केंद्रावर नोंद करण्यात आली. ३.५ रिस्टर स्केअर एवढ्या तीव्रतेचा हा भूकंप असल्याची माहिती हिंगोली जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

मागील पाच वर्षापासून या भागात सातत्याने भूकंपाचे धक्के जाणवत आहेत कधी सकाळी दुपारी तर कधी संध्याकाळी हे भूकंपाचे हादरे नागरिकांना बसत आहेत. मात्र अनेक वेळा या धक्क्याची तीव्रता कमी जास्त असल्याने नागरिकांमध्ये सतत भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान महाराष्ट्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागासह केंद्र शासनाच्या पथकाने देखील या परिसरात येऊन पाहणी केली आहे. त्यांनी देखील या भूकंपाच्या धक्क्यांना गांभीर्याने घेण्याची सुतोवाच केले. नागरिकांनी योग्य की काळजी घेण्याची आवाहन केले आहे. वापटी, कूपटी, खांबाळा, खापरखेड़ा ,शिरली, राजवाड़ी, बोलड़ा, आमदरी ,राजदरी, पिंपळदरी जामगव्हाण नांदापूर व इतर गावांमध्ये या आधी भूकंपाचे धक्के जाणवले आहेत.

# वैमानिक प्रशिक्षण केंद्रामुळे अर्थकारणाला मिळेल बळकटी

## विमानतळ विस्तारीकरणाचीही प्रक्रिया जोरात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अकोला**

एकीकडे शिवणी विमानतळाच्या रुंदीकरणाला गती मिळाली असून, दुसरीकडे आता शहरात वैमानिक प्रशिक्षण केंद्रामुळे रोजगारासह अर्थकारणाला बळकटी मिळणार आहे. आगामी वर्षात हे मुद्दे मार्गी लागणार असून, तरुणाईला त्यांच्या कौशल्यानुसार संधी उपलब्ध होणार आहे.

विमानतळ विस्तारीकरणाचा मुद्दा अनेक वर्षांपासून रखडला आहे. विस्तारीणाबाबत स्थानिक प्रशासन–शासन स्तरावर बैठका झाल्या. विधिमंडळाच्या अनेक अधिवेशानांमध्ये ही लोकप्रतिनिधींकडून चर्चा घडवून आणली. काहींनी सवालही उपस्थित केले होते. मात्र तरीही हा मुद्दा मार्गी लागला नाही. पश्चिम विदर्भातील हवाई वाहतुकीसाठी महत्त्वाचे असलेल्या या विमानतळाच्या धावपट्टीचा मुद्दा एक दशकापेही जास्त वर्षांपासून रखडला होता. दरम्यान काही दिवसांपूर्वी निधी मंजूर कण्यासह भूसंपादचा मार्गही मोकळा झाला. आता अकोल्यात पायलट ट्रेनिंग सेंटरही मंजूर झाले असून, याबाबतची प्रक्रिया सुरु झाली आहे.

विमान पायलट प्रशिक्षण केंद्रासाठी भाजपकडून अकोल्यातून मुख्यमंत्री व केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात



आला. केंद्र मंजूर झाल्याने विदर्भाच्या पश्चिम विदर्भाच्या युवकांना अकोल्यातच दर्जेदार वैमानिक प्रशिक्षणाची सोय होणार आहे.

ट्रेनिंगसाठी अकोल्यातील विद्यार्थ्यांना मुंबई, चेन्नई अन्य ठिकाणी जाण्याची गरज भासणार नाही. तसेच अकोल्याचा विकासाला चालना मिळणार आहे.

याकडे तरुणाईचे लक्ष शिवणी विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी जिल्हाधिकाऱ्यांना भूसंपादन अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात आले भूसंपादन आदेशात आदेश सामान्य प्रशासन विभागाने काही महत्त्वाच्या बाबी नमूद केल्या. धावपट्टीच्या विस्तारासाठी अतिरिक्त २२.२४ हेक्टर आर क्षेत्र संपादित करण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस भूसंपादन संस्था म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. या जागेच्या संपादनासाठी जिल्हाधिकाऱ्यांना भूसंपादन अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे, असे आदेशात म्हटले होते. आता पायलट ट्रेनिंगसाठी कोठे जागा मंजूर होते व पुढील प्रक्रिया केव्हा सुरू होते, याकडे तरुणाईचे लक्ष लागले आहे.


# अजित पवारांच्या गुप्त बैठकींना यश: पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी अखेर एकत्र

**महापालिकेची निवडणूक संयुक्तपणे लढणार, राजकारणाला कलाटणी**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०पुणे–** राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या निवडणुकांचा बिगुल वाजल्यानंतर पुण्याच्या राजकारणात हालचालींना प्रचंड वेग आला आहे. गेल्या काही दिवसांपासून पुण्यात राजकीय हालचाली गुप्तपणे सुरू होत्या. नेते, पदाधिकारी आणि सूत्रधारांच्या बंद दाराआड बैठका, अचानक गाठीभेटी आणि रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या चर्चांमुळे पुण्याच्या राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क लावले जात होते. या सर्व घडामोडींनंतर अखेर मोठा राजकीय निर्णय समोर आला असून, पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येऊन निवडणूक लढवणार असल्यावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती समोर आली आहे. पिंपरी–चिंचवडनंतर आता पुण्यातही दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार असल्याने शहराच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

सुरुवातीला पुणे महापालिकेसाठी दोन्ही राष्ट्रवादींमधील संभाव्य युती जागावाटप आणि काही अंतर्गत मतभेदांमुळे फिस्कटल्याची चर्चा होती. यामुळे दोन्ही गट स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार असल्याचे संकेत मिळत होते. मात्र, पडद्यामागे चर्चा सुरूच होत्या. वरिष्ठ नेते, स्थानिक पदाधिकारी आणि मध्यस्थांच्या बैठका सातत्याने सुरू होत्या. अखेर या चर्चांना यश आले असून, पुणे महानगरपालिकेसाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र निवडणूक लढवणार असल्याचा निर्णय अंतिम झाला आहे. या निर्णयामुळे पुण्यातील निवडणूक



गणिते पूर्णपणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या युतीमध्ये जागावाटपाचाही प्राथमिक फॉर्म्युला निश्चित झाल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुणे महानगरपालिकेतील एकूण जागांपैकी अजित पवार गट १२५ जागांवर निवडणूक लढवणार असून, शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ४० जागांवर आपले उमेदवार देणार आहे. शरद पवार गटाकडून तुतारी या चिन्हावर निवडणूक लढवली जाणार आहे. या जागावाटपाबाबत निर्णय घेण्यासाठी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रमुख पदाधिकारी अंकुश काकडे, विशाल तांबे यांच्यासह इतर नेत्यांची भूमिका महत्त्वाची राहिल्याचे सांगितले जात आहे. जागावाटपाच्या अंतिम चर्चांमध्ये अनेक फेऱ्या झाल्यानंतर हा फॉर्म्युला निश्चित झाल्याची माहिती आहे.

पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र निवडणूक लढवणार असल्याचा निर्णय आता प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या टप्प्यात पोहोचला आहे. याचे पहिले संकेत म्हणजे सकाळपासूनच अजित पवार यांच्या निवासस्थानी एबी फॉर्मचे वाटप सुरू झाले आहे. उमेदवारांना अधिकृत उमेदवारीचे फॉर्म देण्यात येत असून, निवडणूक यंत्रणा प्रत्यक्ष कामाला लागल्याचे स्पष्ट झाले आहे. बैठकींच्या माध्यमातून एकत्र येण्याचा निर्णय केवळ चर्चेपुरता न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरल्याचे दिसून येत आहे.

# महाराष्ट्र पुन्हा गारठणार!

## जानेवारीमध्ये कडाक्याच्या थंडीचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती**



राज्यात थंडीचा कडाका वाढला असून ठिकठिकाणी शेकोट्या पेटलेल्या पाहायला मिळत आहेत. किमान तापमानात घट झाल्याने गुलाबी थंडीने नववर्षाचे स्वागत होणार आहे. आज राज्याच्या किमान तापमानात चढ–उतार कायम राहणार आहे. तर दोन दिवसांत तापमानाचा पारा घसरण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. शिवाय पावसाप्रमाणे थंडीचा मुक्काम देखील लांबणीवर जाणार आहे.

सोमवारी परभणीत ६.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. निफाड येथे ७.३ अंश सेल्सिअस, अहिल्यानगर येथे ७.७ अंश सेल्सिअस, तर धुळे येथे ७.८ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले. गोंदिया येथे ९ अंश, तर जेऊर, नाशिक, भंडारा, बुलडाणा, नागपूर आणि यवतमाळ येथे १० अंशापेक्षा कमी तापमानाची नोंद झाली. आज पहाटेच्या वेळी काहीसे धुके आणि दव पडल्याचे दिसून आले. शिवाय आज राज्यातील कमाल आणि किमान तापमानात चढ–उतार कायम राहण्याबरोबरच थंडी टिकून राहण्याचा अंदाज आहे. दोन दिवसांनंतर किमान तापमानात २ ते ३ अंशांची घट होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

# पार्वती माता गोमाता संस्थांन ला तीर्थक्षेत्र ब वर्ग दर्जा प्राप्त; गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०तिवसा**

गायत्री गोमाता संस्थान सार्सी ता तिवसा ब '' वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा शासनाकडून प्रदान करण्यात आला यामुळे गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ग्रामीण यात्रा स्थळ योजना अंतर्गत धार्मिक क्षेत्रांना ब दर्जा प्राप्त करून विविध सेवा उपलब्ध करून देण्यात येत असतात तिवसा तालुक्यातील सार्शी येथील गायत्री गोमाता संस्थान हा दर्जा मिळाला आहे.सार्सी येथे पार्वती माता(गौमाता)पुण्यतिथी महोत्सव ला प्रारंभ झाला असुन त्यातच पार्वती माता(गौमाता) ला बवर दर्जा मिळाल्यामुळे भक्ताना आनंद द्विगुणित झाला. सार्सी येथील पार्वती माता(गौमाता) संस्थानला बवर्ग दर्जा प्राप्त झाल्यामुळे धार्मिक,सांस्कृतिक व आध्यत्मिक वैभवात मोलाची भर पडली आहे.सार्सी गावकरी ग्रामपंचायत सरपंच सदस्य सर्वांच्या सहकार्य विशेषतः विकील वानखडे यांचे कडून विशेष पाठपुरावा करण्यात आला होता

तिवसा विधानसभा चे आमदार राजेश वानखडे यांच्या माध्यमातून अत्यंत आदर्श असे काम झाल्या मुळे भाविकाचे समाधान व उत्सवा चे वातावरण निर्माण झाले.सार्सी येथील ग्रामपंचायत सरपंचा सौ.रीना मंजू,नंदू तेलमोरे (उपसरपंच), विकील वानखडे( सदस्य), दिलदार पवार( सदस्य), सौ.छायाताई गंजीवाले( सदस्य), सौ.रेखा बऱ्हानकुळे( सदस्य), सौ. सुमन तेलमोरे( सदस्य),कु.निकिता वानखडे (ग्रामविकास अधिकारी),पार्वती माता गोमाता संस्थान तसेच भक्तगणांनी शासनाचे व आमदार राजेश वानखडे यांचे आभार व्यक्त करून ह्या समोर या बदर्जा मुळे भाविकासाठी अधिक चांगल्या सुविधा,धार्मिक उपक्रम, सामाजिक व अध्यात्मिक स्वरूपात राबवता येणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# थंडीपासून बचावासाठी पेटवलेली शेकोटी ठरली 'काळ', तरुणाचा होरपळून मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०यवतमाळ**

विदर्भात सध्या थंडीचा कडाका वाढला असून पारा कमालीचा खाली घसरला आहे. या बोचऱ्या थंडीपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी पेटवलेली शेकोटी एका तरुणाच्या जीवावर बेतली. यवतमाळ शहरालगत असलेल्या पिंपळगाव परिसरात सोमवारी पहाटेच्या सुमारास काळीज पिळवटून टाकणारी ही घटना घडली. घरात उब मिळावी म्हणून पेटवलेली शेकोटीच मृत्यूचा सापळा ठरली आणि एका ३८ वर्षीय तरुणाचा झोपेतच जिवंत जळून करुण अंत झाला. मनीष सदाशिव नागेफासे असे मृत तरुणाचे नाव आहे. या भीषण आगीत संपूर्ण घर भस्मसात झाले असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे.



मनीष व्यवसायाने पेंटर होता आणि पिंपळगाव येथील लालबहादूर शास्त्री शाळेजवळ आपल्या आईसोबत एका झोपडीवजा घरात राहत होता. मिळालेल्या माहितीनुसार, मनीषला दारूचे प्रचंड व्यसन होते, ज्यामुळे घरात सतत कटकटी होत असत. २८ डिसेंबरच्या रात्री आईसोबत त्याचे कडाक्याचे भांडण झाले. नशेत धुंद असलेल्या मनीषने रागाच्या भरात आपल्या वृद्ध आईला घराबाहेर काढले. बाहेर हाडं गोठवणारी थंडी असतानाही त्याने आईला घरात घेतले नाही.

थंडी असह्य झाल्याने मनीषने घराच्या आतच शेकोटी पेटवली. दारूच्या नशेत झिंगलेल्या मनीषला सुरक्षिततेचे भान राहिले नाही. शेकोटी पेटवून तो गाढ झोपी गेला. पहाटे ३ वाजताच्या सुमारास शेकोटीच्या ठिणग्यांनी घरातील साहित्य कवेत घेतले. लाकूड, कापड आणि इतर साहित्यामुळे आगीने क्षणार्धात रौद्र रूप धारण केले. संपूर्ण घराला आगीच्या ज्वाळांनी वेढले होते, मात्र अतिमद्यप्राशन केल्यामुळे मनीषला आगीची साधी चाहूलही लागली नाही. तो मृत्यूच्या विळख्यात असतानाही झोपलेलाच राहिला.

पहाटेच्या वेळी या आगीचे लोळ पाहून शेजारी धावून आले. त्यांनी तातडीने नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाला पाचारण केले. वाहनचालक प्रमोद तिडके आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, आग इतकी भीषण होती की मनीषला वाचवण्याची संधी मिळाली नाही. या घटनेमुळे नागेफासे कुटुंब उघड्यावर आले आहे. यवतमाळ शहर पोलिसांनी याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# मोर्शी तालुक्यातील पुनर्वसन मालूर (वाघोली) येथील नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित

## न्याय न मिळाल्यास निवडणुकीत मतदानावर बहिष्काराचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० मोर्शी**




मोर्शी तालुक्यातील पुनर्वसन मालूर (वाघोली) येथील नागरिक गेल्या पाच वर्षांपासून मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याने संतप्त झाले असून, आपल्या विविध मागण्यांसाठी त्यांनी उपविभागीय अधिकारी, मोर्शी यांना निवेदन सादर केले आहे. मागण्या तात्काळ पूर्ण न झाल्यास येणाऱ्या निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत वनविभागामार्फत सुमारे पाच वर्षांपूर्वी शासनाच्या पुनर्वसन योजनेतून मोर्शी तालुक्यातील वाघोली येथे मालूर हे गाव पुनर्वसित करण्यात आले. मात्र, आजही या पुनर्वसन गावठाणातील जमिनीचे अकृषक (एन.ए.) रूपांतर झालेले नसल्यामुळे ग्रामस्थांना घरकुल, पाणीपुरवठा, वीज कनेक्शन, शौचालय, अंगणवाडी, शाळा, अंतर्गत रस्ते, नळ व सांडपाण्याच्या नाल्या अशा मूलभूत सुविधा मिळू शकलेल्या नाहीत. परिणामी, विविध शासकीय विकास योजनांचाही लाभ नागरिकांना मिळत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.वनविभागामार्फत गावठाण जमिनीची अकृषक प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून, पुढील प्रस्ताव उपविभागीय अधिकारी मोर्शी व नगर रचना विभाग, अमरावती यांच्याकडे प्रलंबित आहे. या विलंबामुळे पुनर्वसन मालूर गावातील विकास कामांना मोठा अडथळा निर्माण झाला असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.संबंधित विभागांनी तात्काळ माहिती घेऊन पुनर्वसन मालूर (वाघोली) येथील गावठाण प्लॉटचे लवकरात लवकर अकृषक जमिनीत रूपांतर करावे, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. या निवेदनाच्या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य शरद मोहोड यांच्यासह पुनर्वसन मालूर येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.मागण्या तात्काळ पूर्ण न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल आणि येणाऱ्या निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकण्यात येईल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# कुंभारगावात रंगणार संत चंद्रभागामाता पुण्यतिथी सोहळा

## मुस्लिम बांधवांकडून काल्याचा महाप्रसाद, सामाजिक ऐक्याचे दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अंजनगाव सुर्जी**



ब्रह्मलीन श्री संत चंद्रभागामातेच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित महोत्सव हा केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता अनेक धर्म, ग्रंथ आणि विचारधारांचा समन्वय साधणारे आध्यात्मिक चिंतन व राष्ट्रीय प्रबोधनाचे व्यासपीठ ठरत आहे. हा पुण्यतिथी महोत्सव मंगळवार आज दि. ३० डिसेंबर २०२५ ते मंगळवार दि. ६ जानेवारी २०२६ या कालावधीत भक्तिभावाच्या वातावरणात संपन्न होणार आहे.महोत्सवाच्या काळात हं.भ.प.य. निलेश महाराज गावंडे (कुभारगावकर) यांच्या अमृततुल्य वाणीचा लाभ भाविकांना मिळणार असून, त्यांच्या प्रवचनातून अध्यात्म, सामाजिक सलोखा, धर्मसमन्वय आणि राष्ट्रप्रबोधन यावर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे. विविध धर्मग्रंथांतील मानवतावादी विचारांचा संगम हे या प्रवचनांचे वैशिष्ट्य असणार आहे.या महोत्सवातील काल्याच्या दिवशी होणारा महाप्रसाद हा विशेष चर्चेचा विषय ठरत आहे. निंभारी गावातील मुस्लिम बांधव शेख गुलाब शेख तुराब यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार असून, ही बाब धर्मापलीकडील माणुसकी आणि सामाजिक ऐक्याचे जिवंत उदाहरण ठरत आहे.धर्म, जात, पंथ यांच्या पलीकडे जाऊन मानवतेचा संदेश देणारा हा उपक्रम समाजात सौहार्द, बंधुभाव आणि एकात्मतेचा विचार दृढ करणारा असल्याची भावना भाविक व उपस्थितांमधून व्यक्त केली जात आहे. संत चंद्रभागामातेच्या विचारांचा वारसा पुढे नेणारा हा पुण्यतिथी महोत्सव परिसरात आध्यात्मिक जागृतीचे केंद्र बनला आहे.

# संत गजानन महाराज संस्थानच्या दाव्यांवर सहा महिन्यांत निर्णय द्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० शेगाव**

शेगाव येथील संत गजानन महाराज संस्थानने मंदिर परिसरातील १२ भाडेकरू दुकानदारांविरुद्ध दाखल केलेले दावे सहा महिन्यांत निकाली काढा, असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाने दिवाणी न्यायालयाला दिला आहे. भक्तांच्या सोयीकरिता मंदिर परिसर स्वच्छ व प्रशस्त करण्यासाठी संस्थानला संबंधित दुकानांची जागा हवी आहे. त्यामुळे संस्थानने दुकाने रिकामी करून घेण्यासाठी २०१६ मध्ये दिवाणी न्यायालयात दावे दाखल केले आहेत.दरम्यान, या दाव्यांमध्ये पुरावे नोंदणी सुरू असताना दुकानदारांनी विविध कारणांसाठी दोन अर्ज दाखल केले होते. ते अर्ज दिवाणी न्यायालयाने फेटाळून लावले. परिणामी, दुकानदारांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. त्यावर न्यायमूर्ती प्रफुल्ल खुबाळकर यांच्यासमक्ष सुनावणी झाली.

# दर महिन्याला ३ जि.प. अधिकारी कर्मचारी 'वॉल ऑफ फेम'वर

## कार्यक्षमतेच्या सन्मानासाठी अमरावती झेडपीची अभिनव संकल्पना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**



जिल्हा परिषदेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेला प्रोत्साहन देण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) संजीता महापात्र यांनी एक अभिनव संकल्पना सुरू केली आहे. यानुसार, दर महिन्याला तीन उत्कृष्ट अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे फोटो 'वॉल ऑफ फेम'वर प्रदर्शित केले जातील. अमरावती जिल्हा परिषद हा प्रयोग राबवणारी शहरातील पहिली स्थानिक स्वराज्य संस्था ठरली आहे.

या उपक्रमासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची निवड करताना काही निकष ठरवण्यात आले आहेत. यात सामान्य नागरिक आणि कार्यालयप्रमुखांनी सोपवलेली कामे वेळेत पूर्ण करणे, कार्यालयीन व्यवहार स्वच्छ व पारदर्शक ठेवणे आणि सेवा नियमांनुसार इतर जबाबदाऱ्या पार पाडणे यांचा समावेश आहे. जिल्हा परिषदेमार्फत शासनाच्या विविध योजना व उपक्रम राबवले जातात, ज्यासाठी अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे असते. त्यांच्या या प्रयत्नांचा गौरव करणे हा यामागील उद्देश आहे.

सीईओ संजीता महापात्र यांच्या मते, या उपक्रमामुळे इतर कर्मचाऱ्यांनाही प्रेरणा मिळेल आणि कार्यालयीन कार्यक्षमतेत वाढ होईल. 'नव्या वर्षात नवे काही' या संकल्पनेनुसार, हा उपक्रम जानेवारी महिन्यापासून सुरू करण्यात येणार आहे. 'बेस्ट एम्प्लॉई ऑफ द मंथ' म्हणून निवड झालेल्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्याचे छायाचित्र 'वॉल ऑफ फेम'वर प्रसिद्ध केले जाईल. यासाठी दर महिन्याला वेगवेगळ्या विभागांतील तीन कर्मचाऱ्यांची निवड केली जाईल.

या निवडीसाठी एक विशिष्ट प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. सुरुवातीला, संबंधित खातेप्रमुख त्यांच्या विभागातून प्रत्येकी तीन नावांची शिफारस करतील. सर्व खातेप्रमुखांकडून प्राप्त झालेल्या नावांचा एकत्रित विचार करून त्यातून अंतिम तीन नावांवर शिक्कामोर्तब केले जाईल. यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक निवड समिती स्थापन करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, कोणताही कर्मचारी स्वतःहूनही आपली माहिती सादर करू शकतो, ज्यासाठी क्यूआर कोड उपलब्ध करून देण्यात आला आहे.

याव्यतिरिक्त, जर एखाद्या कार्यालयाच्या उपक्रमाला किंवा कामाला राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावर गौरव मिळाला असेल, तर संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्याचे त्या कार्यक्रमातील छायाचित्र 'वॉल ऑफ फेम'वर प्रकाशित करून त्यांचा विशेष सन्मान केला जाईल.

या उपक्रमाबाबत बोलताना सीईओ संजीता महापात्र म्हणाल्या, विहित कालावधीत उद्दिष्टपूर्ती करणे हे कर्मचाऱ्यांचे कर्तव्य असले तरी, असे उत्कृष्ट काम करणाऱ्यांचा गौरव करणे आवश्यक आहे. यातून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना नवीन प्रेरणा मिळते. म्हणूनच, प्रत्येक महिन्यात उत्कृष्ट कार्य आणि उद्दिष्टपूर्ती करणाऱ्यांची 'बेस्ट एम्प्लॉई ऑफ द मंथ' म्हणून निवड करून त्यांचा योग्य सन्मान केला जाईल आणि त्यांची छायाचित्रे 'वॉल ऑफ फेम'वर प्रकाशित केली जातील.

# उमेदवार मनपाचा कंत्राटदार नसावा स्वयंघोषणापत्र सादर करावे लागणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**




मी किंवा माझ्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने अनधिकृत बांधकाम केलेले नाही तसेच निवडून आल्यानंतर मी किंवा माझे कुटुंबीय भ्रष्ट मार्गाचा अवलंब करणार नाही. तसेच मी किंवा माझे कुटुंबीय महापालिकेचा कोणतेही कंत्राट घेणार नाही. याबाबतची माहिती महापालिका निवडणुकीसाठी अर्ज भरताना उमेदवारांना द्यावी लागणार आहे.

महापालिका निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांसाठी निवडणूक आयोगाने कठोर नियम बनविले. शपथपत्राचाही या नियमांमध्ये समावेश आवश्यक कागदपत्रांसह जबाबदारीच्या आहे. त्यामुळे निवडून आल्यानंतर उमेदवारांना दिलेल्या शपथपत्राप्रमाणे महापालिकेचा कारभार करावा लागणार आहे. उमेदवार महापालिकेचा कंत्राटदार नसावा व त्याच्याकडे महापालिकेची कुठलीच थकबाकी नसावी, याबाबतची माहिती त्यांना द्यावी लागणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी अंतिम निर्णय घेतील.

उमेदवाराद्वारा निवडणूक खर्चाचा हिशोब निवडणूक निकाल लागल्याचे ३० दिवसांच्या आत सादर न केल्यास मी अनर्ह ठरेल, याबाबतचे हमीपत्र उमेदवारी अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे.१२ सप्टेंबर २००१ नंतर झालेल्या अपत्यामुळे एकूण अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक होत असल्यास, ती व्यक्ती महापालिकेची निवडणूक लढण्यास अपात्र ठरणार आहे. त्यामुळे उमेदवारांना अपत्यांबाबत शपथपत्र सादर करावे लागणार आहे.

उमेदवारांना अर्जासोबत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याबाबतचे हमीपत्र, अपत्याबाबतचे हमीपत्र, शौचालय वापराबाबतचे स्वयंघोषणापत्र, निवडणूक खर्चाचे हमीपत्र, नमुना स्वाक्षरी सादर करणे अनिवार्य आहे.उमेदवारांनी अर्ज भरताना निवडणूक आयोगाच्या नियमानुसार आवश्यक असलेली माहिती चुकीची दिली तर सदर उमेदवार निवडून आल्यानंतर त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई होऊ शकते.उमेदवारांसाठी यावेळी कठोर नियम आहेत. अर्जासोबत काय काय माहिती सादर करावी लागते, याची माहिती आरओ यांच्या कार्यालयातील कक्षात उमेदवारांना पुरविली जात आहे.महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरताना अर्जासोबत शहर विकासासंबंधीची माहिती सादर करावी लागणार आहे. १०० ते ५०० शब्दमर्यादेत निवडून आल्यानंतर प्रभागात कोणत्या विकास योजना

उमेदवार हा कंत्राटदार नसावा, शिवाय निवडून आल्यास विकासासाठी काय करणार याबाबत १०० ते ५०० शब्दांपर्यंत माहिती द्यावी लागेल. अशी माहिती विजय लोखंडे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली.

# पर्यावरणास घातक चायना मांजाविक्रीवर गुन्हे शाखेची धडक कारवाई; १२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत घातक आणि शासनाने प्रतिबंधित केलेल्या चायना मांज्याच्या विक्रीविरोधात अमरावती शहर गुन्हे शाखेने धडक कारवाई करत एका इसमावर गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत चायना मांजाच्या १२ चक्र्या जप्त करण्यात आल्या असून, जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे १२ हजार रुपये आहे.मा. पोलीस आयुक्त श्री. राकेश ओला साहेब यांनी अमरावती शहरात पर्यावरणास घातक चायना मांज्याची बेकायदेशीर विक्री मोठ्या प्रमाणात होत असल्याने, अशा विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते.



चायना मांज्यामुळे नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण होत असून, पक्षी व पर्यावरणाचेही मोठे नुकसान होत असल्याच्या पार्श्वभूमीवर हे आदेश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाईची रूपरेषा आखली.गुन्हे शाखेचे पथक पोलीस आयुक्तालय हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीलायक माहिती मिळाली. पिंटु चांदेकर नावाचा इसम बाकळेवाडी सिलांगण रोड परिसरात, त्याच्या राहत्या घरासमोर शासनाने प्रतिबंधित केलेला चायना मांजा जवळ बाळगून विक्री करत असल्याची माहिती प्राप्त झाली. या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ बाकळेवाडी परिसरात सापळा रचून छापा टाकला.छाप्यादरम्यान भुषण उर्फ पिंटु मनोहरराव चांदेकर (वय ४०, रा. बाकळेवाडी सिलांगण रोड, अमरावती) हा त्याच्या घरासमोर एका पिशवीत पर्यावरणास घातक असलेला शासन प्रतिबंधित चायना मांजा लोकांना विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगताना आढळून आला. त्याच्या ताब्यातून मोनो फायटर केटीसी कंपनीच्या चायना मांजाच्या एकूण १२ चक्र्या जप्त करण्यात आल्या. प्रत्येकी १,००० रुपये किमतीच्या या चक्र्यांची एकूण किंमत १२,००० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.या प्रकरणी आरोपी भुषण उर्फ पिंटु मनोहरराव चांदेकर याच्याविरुद्ध पोलीस स्टेशन राजापेठ येथे भारतीय न्याय संहिता कलम ४९, २२३ तसेच पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू असून, शहरात चायना मांज्याची साठवणूक व विक्री करणाऱ्या इतरांवरही कारवाईचा इशारा पोलिसांनी दिला आहे.ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सपोनि महेश इंगोले तसेच पोलीस अंमलदार गजानन ढेवले, मनोज ठोसर, मंगेश परीमल, संग्राम भोजने, विकास गुडधे, सैयद नईम बेग, सागर ठाकरे व योगेश पवार यांनी ही यशस्वी कारवाई केली.

# जागावाटपाचा तिढा न सुटल्याने अमरावतीत महायुती कोलमडली

## शिवसेना शिंदे गट सर्व ८७ जागांवर स्वबळावर मैदानात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीत मोठी आणि निर्णायक घडामोड घडली आहे. भाजप-शिवसेना (शिंदे गट) यांच्यातील जागावाटपावरून सुरू असलेले मतभेद अखेर टोकाला पोहोचले असून, शिवसेना शिंदे गटाने महानगरपालिकेच्या सर्व ८७ जागांवर स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयामुळे अमरावतीच्या राजकारणात खळबळ उडाली असून आगामी निवडणूक अधिकच चुरशीची होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.शिवसेना शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते व मंत्री संजय राठोड यांनी पत्रकारांशी बोलताना या निर्णयाची अधिकृत माहिती दिली. त्यांनी स्पष्ट केले की, भाजपकडून कुठलाही दगा-फटका किंवा अन्याय झालेला नाही; मात्र जागावाटपाच्या प्रक्रियेत शिवसेनेच्या कार्यकर्त्यांना अपेक्षित संधी आणि न्याय मिळत नसल्याची भावना निर्माण झाली होती. हीच भावना लक्षात घेऊन स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.राठोड म्हणाले, महायुतीच्या माध्यमातून निवडणूक लढवावी, ही आमच्या वरिष्ठ नेत्यांची सुरुवातीपासून भूमिका होती. त्यासाठी अनेक बैठका, चर्चा आणि वाटाघाटीही झाल्या. मात्र शेवटपर्यंत जागावाटपाचा प्रश्न सुटू शकला नाही. आमचे कार्यकर्ते हट्टी आणि आग्रही आहेत. त्यांना योग्य संधी न मिळाल्यास नाराजी वाढते, संघटन कमजोर होते. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या भावना आणि संघटनेचे भवितव्य लक्षात घेऊन स्वबळाचा मार्ग स्वीकारणे अपरिहार्य ठरले.अमरावती महानगरपालिकेत शिवसेना शिंदे गटाची संघटनात्मक ताकद मजबूत असल्याचा दावा त्यांनी केला. शहरातील विविध प्रभागांमध्ये पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते, इच्छुक उमेदवार आणि स्थानिक नेतृत्व तयार असून, त्यांना न्याय देण्यासाठीच सर्व ८७ जागांवर उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी नमूद केले. आम्ही केवळ निवडणूक लढवत नाही, तर प्रत्येक प्रभागात सक्षम, लोकांशी जोडलेले उमेदवार देणार आहोत, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.भाजपबाबत बोलताना राठोड यांनी समन्वयाची भूमिका ठेवली. भाजप हा आमचा मित्रपक्ष आहे आणि भविष्यातही तो मित्रपक्षच राहील. स्थानिक पातळीवर राजकीय स्पर्धा असली, तरी ती मैत्रीपूर्णच असेल, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे निवडणुकीदरम्यान आरोप-प्रत्यारोपांची धार मर्यादित राहील, असा संकेतही त्यांनी दिला.महायुतीत झालेल्या या तुटीमुळे अमरावती महानगरपालिका निवडणूक आता बहुरंगी आणि अधिक चुरशीची होणार आहे. शिवसेना शिंदे गट स्वबळावर उतरल्याने मतांचे विभाजन होण्याची शक्यता वाढली असून, त्याचा थेट परिणाम निवडणुकीच्या निकालावर होऊ शकतो. एकीकडे भाजप, दुसरीकडे शिवसेना शिंदे गट आणि इतर विरोधी पक्ष यांच्यातील लढत कशी रंगते, याकडे आता संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



### ज्या जागा मागितल्या होत्या, त्या मिळाल्याच नाहीत – कॅप्टन अभिजीत अडसूळ

अभिजीत अडसूळ म्हणाले, महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना शिंदे गटाने ज्या जागा मागितल्या होत्या, त्या आम्हाला मिळाल्याच नाहीत. पण, जेवढी संख्या पाहिजे, त्यापैकी केवळ ३० टक्केच जागा देण्यात आल्या. ज्यावेळी आम्ही बैठकीमध्ये चर्चा करीत होतो, तेव्हाच लक्षात आले की, ज्या ठिकाणी आमचे नगरसेवक गेल्यावेळी निवडून आले होते, ती जागा भाजपने शिंदे गटाला सोडलेली दाखवली, पण या जागांवर युवा स्वाभिमान पक्षाच्या उमेदवारांनी संपूर्ण तयारी केल्याचे दिसले आणि त्याचे पोस्टर, बॅनर्स आमच्यापर्यंत पोहचले. ही पारदर्शी युती होणार नाही, हे आमच्या लक्षात आले. त्यामुळेच आम्ही स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेतला आहे.

# अमरावतीत शिंदे गटाच्या शिवसेनेत तिकीट वाटपाच्या वेळी गोंधळ

## एबी फॉर्म न मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये धक्काबुक्की



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

राज्यात महायुतीचे सरकार असले, जरी अमरावती महापालिकेत मात्र भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट स्वतंत्रपणे निवडणूक लढत आहे. भाजप आणि शिवसेना शिंदे गटासोबत युतीची बोलणी शेवटच्या क्षणी फिस्कटली आणि शिंदे गटाने स्वबळावर निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला. पक्षाची उमेदवारी मिळवण्यासाठी कार्यकर्त्यांनी हॉटेल मेहफिल इन येथे मोठी गर्दी केली होती. तिकीट वाटपाच्या वेळी निष्ठावंताना डावलून इतर पक्षातील कार्यकर्त्यांना उमेदवारी दिली जात असल्याचा आरोप करीत काही कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला.

मंगळवारी सकाळपासून अमरावतीत नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या. शिवसेना शिंदे गटाचे नेते माजी आमदार अभिजीत अडसूळ यांनी युती तुटल्याचे जाहीर केले, तर शिंदे गटाचे नेते माजी राज्यमंत्री जगदीश गुप्ता हे शिंदे गटातून बाहेर पडले. आपल्याला दिलेले वचन पाळले गेले नाही, असा आरोप त्यांनी केला. दुसरीकडे, हॉटेल मेहफिल येथे तिकीट वाटपाच्या वेळी काही कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला. निष्ठावंतांना डावलून आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्याला उमेदवारी दिली जात असल्याचा आरोप काही कार्यकर्त्यांनी केला. त्यावेळी चांगलीच बाचाबाची झाली. त्यानंतर काही जणांनी या संतप्त कार्यकर्त्यांना शांत केले.

शिवसेना शिंदे गटात इच्छूक उमेदवारांची संख्या मोठी आहे. त्या तुलनेत भाजपने कमी जागा देऊ केल्या होत्या. तरीही मतविभाजन टाळण्यासाठी शिंदे गटाने प्रस्ताव मान्य केला होता, पण हक्काच्या जागा बदलण्यात आल्याने शिंदे गटाने नाराजी व्यक्त केली. रात्रभरातून या जागा बदलण्यात आल्याचा आणि यात युवा स्वाभिमान पक्षाचा हस्तक्षेप असल्याचा आरोप शिंदे गटाने केला आहे. शिंदे गटाचे नेते आनंदराव अडसूळ आणि राणा दाम्पत्यामधील राजकीय संघर्ष जुना आहे. तो आता पुन्हा उफाळून येण्याची शक्यता आहे.उमेदवारी वाटपातील गोंधळ आणि अंतर्गत असंतोषामुळे शिंदे गटाच्या शिवसेनेसमोर अडचणी वाढल्याचे चित्र असून, या घडामोडींचा आगामी निवडणुकीवर काय परिणाम होणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# अमरावती एमआयडीसीमध्ये प्लॅस्टिक विरोधात महापालिकेची धडक कारवाई

## ३९४ पोती जप्त, २५ लाखांचा साठा उध्वस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

अमरावती शहर प्लॅस्टिकमुक्त करण्याच्या दिशेने अमरावती महानगरपालिकेने निर्णायक पाऊल उचलले आहे.मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या ठोस व कठोर निर्देशांनुसार महापालिकेच्या जनसंपर्क व संबंधित विभागांच्या संयुक्त पथकाने चखऊ परिसरात प्रतिबंधात्मक प्लॅस्टिकविरोधात मोठी कारवाई केली.रात्री उशिरा करण्यात आलेल्या या कारवाईत चखऊ परिसरातील एका गोडाऊनवर छापा टाकून तब्बल ३९४ पोती प्रतिबंधित प्लॅस्टिक जप्त करण्यात आले. या प्लॅस्टिकचे एकूण वजन ११,८२० किलो असून त्याची अंदाजे बाजार किंमत सुमारे २५ लाख रुपये इतकी आहे. महापालिकेच्या पथकाने घटनास्थळी पंचनामा करून प्लॅस्टिक बंदी नियमांनुसार संबंधितावर ५,००० रुपयांचा दंड आकारला.ही कारवाई रात्री १२.३० वाजेपर्यंत सुरू होती. मोठ्या प्रमाणावर प्लॅस्टिक साठवणूक व वितरण होत असल्याचे निदर्शनास आल्याने संपूर्ण साठा जप्त करून उध्वस्त करण्यात आला. या धडक कारवाईमुळे शहरात प्रतिबंधात्मक प्लॅस्टिकचा वापर व साठवणूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, महापालिकेच्या कठोर भूमिकेचा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी शहर स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी भविष्यातही अशाच प्रकारच्या कठोर व सातत्यपूर्ण कारवाया केल्या जातील, असा इशारा दिला आहे. प्लॅस्टिक बंदी नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.



# अचलपूर नगरपालिकेत नगराध्यक्ष रुपाली अभय माथने यांचा ऐतिहासिक पदग्रहण सोहळा

## आमदार प्रवीण तायडे यांच्या हस्ते कार्यभार स्वीकार; तीन ई-बाईकचे लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अचलपूर**

अचलपूर नगरपालिकेत नवनिर्वाचित नगराध्यक्ष सौ. रुपाली अभय माथने यांचा पदग्रहण समारंभ आज मंगळवारी अत्यंत उत्साहपूर्ण व ऐतिहासिक वातावरणात पार पडला. विधिवत पूजन करून नगराध्यक्षांनी अधिकृतपणे आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. या सोहळ्याने अचलपूर नगरपालिकेच्या राजकीय व प्रशासकीय इतिहासात एक नवा अध्याय जोडला गेला.या भव्य पदग्रहण समारंभास अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे यांच्या हस्ते नगराध्यक्ष रुपाली माथने यांनी पदभार स्वीकारला. यावेळी नगरविकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या तीन ई-बाईकचे वाटप कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले, ज्यामुळे पर्यावरणपूरक आणि आधुनिक प्रशासनाचा संदेश देण्यात आला.या प्रसंगी निवडणूक प्रभारी विनोद वाघ, मेळघाट जिल्हा अध्यक्ष प्रभुदास भिलावेकर, जिल्हा उपाध्यक्ष सुधीर रसे, भाजयुमो जिल्हाध्यक्ष तुषार खेरडे, जिल्हा सरचिटणीस नयना जोशी यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. तसेच अचलपूर-परतवाडा शहर व परिसरातील भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.पदग्रहणानंतर बोलताना नगराध्यक्ष सौ. रुपाली अभय माथने यांनी अचलपूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगत, नागरिकांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी पारदर्शक, गतिमान व लोकाभिमुख प्रशासन देण्याचा निर्धार व्यक्त केला.आमदार प्रवीण तायडे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात नगरपालिकेच्या माध्यमातून शहराच्या पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा व विकासकामांना प्राधान्य दिले जाईल, असे आश्वासन दिले.संपूर्ण पदग्रहण सोहळा उत्साह, विश्वास आणि विकासाच्या संकल्पाने भारलेला असून, अचलपूर शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा दिवस ऐतिहासिक ठरल्याची भावना उपस्थितांमध्ये दिसून आली.



# भातकुलीतील कापसाच्या जिनिंग फॅक्टरीला भीषण आग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०भातकुली**

अमरावती जिल्ह्यातील भातकुली येथे असलेल्या कापसाच्या जिनिंग फॅक्टरीला आज भीषण आग लागल्याची घटना घडली. आगीने काही वेळातच उग्र रूप धारण केल्याने फॅक्टरीतील साठवलेला संपूर्ण कापूस जळून खाक झाला आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.आगीची माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशामक दलाकडून शर्तीचे प्रयत्न सुरू असून, मोठ्या प्रमाणात पाणी फवारून आग विझवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. कापूस असल्याने आग पटकन पसरत असल्यामुळे आग आटोक्यात आणण्यात अडचणी येत असल्याचे सांगण्यात येत आहे.या आगीत मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असून, सुदैवाने अद्याप कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही. आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, आग आटोक्यात आल्यानंतर पंचनामा करून तपास केला जाणार असल्याची माहिती संबंधित यंत्रणांनी दिली आहे.

# अकोला महापालिकेत 'भाजप-राष्ट्रवादी' च्या युतीची घोषणा

## ८० पैकी १४ जागांवर राष्ट्रवादीचे उमेदवार; तर शिंदेसेनेचा स्वबळाचा नारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अकोला २९**

अकोला महापालिकेत भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीची युतीची घोषणा झालीय. काही जागा वाटपावरून भाजप आणि राष्ट्रवादीमध्ये तिढा होता. मात्र, राष्ट्रवादीचे मंत्री इंद्रनील नाईक, राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी आणि भाजपचे आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे यांच्या चर्चेतून अखेर तिढा सुटलाय. भाजप आणि राष्ट्रवादीने संयुक्त पत्रकार परिषदेतून युतीची घोषणा केलीय. ज्यामध्ये ८० पैकी १४ जागांवर राष्ट्रवादी निवडणूक लढणार, तर उर्वरित जागांवर भाजप उमेदवार देणारेय. या घोषणेमुळे अकोल्यात शिंदेंची सेना मात्र एकटी पडलीय. आता या महायुतीतील दोन्ही पक्षांशी शिंदोंच्या सेनेची अकोला महापालिकेत मैत्रीपूर्ण लढत पहायला मिळणार आहे.



अकोल्यात महायुती फिस्कटली असून भाजप आणि अजित दादांची राष्ट्रवादी एकत्र येत युतीची घोषणा केलीय. तर दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने स्वबळाचा नारा दिलाय. महायुतीमधील जागावाटप फिस्कटल्याने अखेर शिवसेनेने स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतलाय. काल (सोमवारी) रात्री उशिरापर्यंत मंत्री संजय राठोड यांच्या नेतृत्वात पक्षाची बैठक पार पडली. या बैठकीत शिवसेनेने हा 'ऐकला चलो रे'चा नारा दिलाय. त्यामुळे अकोला महापालिकेच्या निवडणूकीत भाजप आणि अजित पवारांची राष्ट्रवादी एकत्रित लढणारेये. तर शिवसेना पक्ष ८० जागांवर आपले उमेदवार देणारेये, अशी घोषणा शिवसेनेचे नेते तथा माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया यांनी केली.

मात्र, नामांकन अर्ज दाखल करण्यासाठी मोजके काही तास राहिले, अशातही मंत्री संजय राठोड यांनी महायुती टिकवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे म्हटलंये. तर राष्ट्रवादीचे प्रभारी मंत्री इंद्रनील नाईक आणि आमदार अमोल मिटकरींनी संजय राठोड, बाजोरिया आणि इतर सेना नेत्यांची भेट घेत भाजप आणि राष्ट्रवादीच्या युतीच्या निर्णयाची माहिती दिलीय.

# नांदगावच्या नगराध्यक्ष पदभार स्वीकारण्याआधी ॲक्शन मोडवर

## नगरपंचायतीची झाडाझडती, डम्पिंग ग्राऊंड, जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी : अधिकाऱ्यांना आधुनिक पद्धतीने कचरा विल्हेवाट लावण्याच्या सूचना : गैरहजर कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नांदगाव खंडेश्वर**

नवनिर्वाचित नगराध्यक्ष सौ प्राप्ति मारोटकर व नगरसेवकांनी पदभार स्वीकारण्या आधीच क्शन मोडवर नगरपंचायत कार्यालयात सकाळी १० वाजताच झाडाझडती घेऊन विनापरवानगी गैरहजर कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन विना पगारी करण्याचे निर्देश नगराध्यक्षांनी दिले त्यामुळे न.पं. कर्मचाऱ्यांत धास्ती निर्माण झाली आहे. नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर यांनी नगरपंचायत कार्यालयात सकाळी अचानक धडक देऊन कार्यालयाची पाहणी केली यावेळी मुख्याधिकारी सुट्टीवर असल्याने न.पं. कार्यालयातील अनेक कर्मचारी विनापरवानगी गैरहजर आढळून आले त्यांना लगेच कारणे दाखवा नोटीस देऊन विना पगारी करण्यात आले.तसेच लाखो रुपये खर्च करून कचऱ्याचे डम्पिंग ग्राउंड निर्माण केले मात्र सदर डम्पिंग ग्राउंड पूर्णपणे अस्तव्यस्थ झाले आहे यावेळी आधुनिक पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट करण्याचे निर्देश दिले तसेच नांदगाव शहराला पाणीपुरवठा करणारे जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी केली यावेळी पाणी स्वच्छ होत नसल्याची बाब निर्देशनांस आली सदर जल शुद्धीकरण केंद्रात योग्य त्या सुधारणा करण्याचे निर्देश दिले पाणी पुरवठा,स्वच्छता, आरोग्य इत्यादी विभागाचा मुख्याधिकाऱ्यांच्या गैरहजेरीतच आढावा घेण्यात आला बस स्थानक परिसरातील शौचालयाची दुर्गंधी पाहून नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांना चांगले धारेवर धरत चांगलीच कानउघाडणी केली यावेळी नगरसेवक प्रकाश मारोटकर, प्रीती इखार, कांता लोमटे, वसुदेव लोखंडे, राष्ट्रवादीचे मो.साजिद इत्यादी उपस्थित होते.



**जलशुद्धीकरण केंद्रातील धक्कादायक बाब उघड मशीनरी बंद**

नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर यांनी जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी केली असता पाणी स्वच्छ करणाऱ्या बहुतांश मशीनरीच बंद असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली. यावेळी पाणी पुरवठा कर्मचारी निरुत्तर झाले तात्काळ उपाय योजना करण्याचे निर्देश दिले.

# नागपूरमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे कार्यालय फोडले; उमेदवारी न मिळाल्याने संतप्त पदाधिकाऱ्यांचा राडा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नागपूर**

नागपूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे कार्यालयाची तोडफोड करण्यात आली. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे गणेश पेठ येथील कार्यालयामध्ये उमेदवारी न मिळाल्यामुळे नाराज कार्यकर्त्यांनी तोडफोड केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. राष्ट्रवादीच्या कार्यालयातील टीव्हीसह अनेक वस्तूंची तोडफोड करण्यात आली. याचे व्हिडीओ समोर आला असून तो व्हायरल होत आहे.

नागपूरमध्ये अजित पवार गटाकडून स्वबळाचा नारा देण्यात आला आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात इच्छुक उमेदवारांची कार्यालयाबाहेर गर्दी झाली होती. यात काही इच्छुक उमेदवारांना उमेदवारी न मिळाल्यामुळे नाराज होत त्यांनी कार्यालयात घुसून कार्यालयातील टीव्हीसह अनेक वस्तूंची तोडफोड करण्यात आली. यावेळी सर्वांनाच उमेदवारी मिळू शकत नसल्याने ही नाराजी व्यक्त केल्याचे सांगितलं जातं आहे.





आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत